नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. २८ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# हल्ल्यानंतरही इराण शांतता चर्चेत

**दोहा : (स. गांवकरी)**

अमेरिकेने इराणच्या लष्करी ठिकाणांवर केलेल्या ताज्या हल्ल्यानंतरही दोन्ही देशांमधील प्रस्तावित शांतता करार अजूनही चर्चेत आहे. इराणचे मुख्य मुत्सद्दी मोहम्मद बगेर कालिबाफ हे सध्या कतारमध्ये ठाण मांडून आहेत. त्याचवेळी इराण युद्धबंदी जाहीर करण्यासंदर्भात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंत्रिमंडळाची बैठक निमंत्रित केली आहे.

अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनी भागात इराणचे क्षेपणास्त्र लाँचर्स आणि खाणी नष्ट करण्यासाठी हवाई हल्ले केले. यात इराणचे 4 सैनिक ठार झाले आहेत. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याचा तीव्र निषेध करत याला विश्वासघात आणि अल्पकालीन युद्धबंदीचे थेट उल्लंघन असे म्हटले आहे. मात्र, तरीही इराणने पाकिस्तान, कतारच्या मध्यस्थीने सुरू



असलेल्या शांतता चर्चेतून माघार घेतलेली नाही. इराणचे गोठवलेले 12 अब्ज डॉलर्स (सुमारे 9,000 कोटी रुपये) परत मिळवणे आणि इराणच्या तेल निर्यातीवरील निर्बंध शिथिल करणे हा या चर्चेचा मुख्य उद्देश आहे. इराणला आपल्या संरक्षणाच्या इतिहासातील हा एक मोठा टप्पा म्हणून सादर करायचा आहे, त्यामुळे ते सध्या तरी कोणताही मोठा लष्करी पलटवार करून ही चर्चा मोडू इच्छित नाहीत. दुसरीकडे, या नव्या संघर्षामुळे जागतिक बाजारात ब्रेंट क्रूड तेलाच्या किमती 4 टक्क्यांनी वधारल्या आहेत.

या शांतता करारात इस्रायल आणि लेबनॉनमधील युद्धबंदीचाही समावेश करण्याचा इराणचा प्रयत्न आहे. परंतु, मंगळवारी रात्री इस्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनमधील 19 गावांना रिकामे करण्याचा इशारा दिला असून त्यांचे जमिनीवरील ऑपरेशन अधिक तीव्र केले आहे. इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनी यांनी हज यात्रेच्या निमित्ताने दिलेल्या संदेशात म्हटले आहे की, अमेरिकेचा काळ आता संपत आला असून, इस्रायल आपल्या अंताच्या जवळ आहे.

दरम्यान, वॉशिंग्टनहून आलेल्या वृत्तानुसार, इराणसोबतच्या शांतता कराराची चर्चा आता एका अत्यंत गंभीर वळणावर येऊन पोहोचली आहे. या संवेदनशील परिस्थितीमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी बुधवारी कॅम्प डेव्हिड या राष्ट्रपतींच्या निवासस्थानी एक अत्यंत दुर्मीळ आणि महत्त्वाची कॅबिनेट बैठक बोलावली आहे. या संपूर्ण बैठकीत इराणचा मुद्दा सर्वात महत्त्वाचा असणार आहे.

### ‘कॅम्प डेव्हिड’ करारांचा साक्षीदार

कॅम्प डेव्हिड हे ठिकाण अमेरिकेच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक राजनैतिक करारांचे साक्षीदार राहिले आहे. 1978 मध्ये राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांच्या नेतृत्वाखाली इस्रायल आणि इजिप्त यांच्यातील प्रसिद्ध कॅम्प डेव्हिड करार येथेच झाला होता. तसेच 2000 मध्ये बिल क्लिंटन यांच्या काळात झालेली इस्रायल-पॅलेस्टाईन शिखर परिषदही याच ठिकाणी पार पडली होती.

- इराणसोबतची चर्चा गंभीर टप्प्यावर पोहोचल्यामुळे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी कॅम्प डेव्हिड येथे तातडीची कॅबिनेट बैठक बोलावली आहे.
- अमेरिकेच्या हल्ल्यात इराणचे 4 सैनिक मारले गेले असले, तरी इराणने कतारमधील शांतता चर्चेतून माघार घेतलेली नाही.
- इराण आपले गोठवलेले 12 अब्ज डॉलर्स परत मिळवण्यासाठी आणि तेल निर्यातीवरील निर्बंध हटवण्यासाठी आग्रही आहे.

## कुंभमेळ्यासाठी ६,१६२ कोटींच्या कामांना मंजूरी



**मुंबई : (स. गांवकरी)**

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता तब्बल सहा हजार १६२ कोटींच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यात प्रामुख्याने घाट बांधणी, जोडरस्ते, रिंगरोड, जलशुद्धीकरण केंद्र, सीसीटीव्ही बसविणे, पूल बांधणी, पावसाळी गटाराची कामे, विद्युत वाहिन्या, ऑप्टिकल फायबर पाईप टाकणे, वाढीव पाणीपुरवठा आदी ६८ प्रकारची कामे मार्गी लावली जाणार आहेत.

कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकवरील पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, विद्युत पुरवठा, सुरक्षा व्यवस्था आदी पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर ताण येणार आहे. त्याकरिता नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा

**■ ६८ विकास कामे मार्गी लागणार**

प्राधिकरणाकडून कुंभमेळ्याकरिता दोन टप्प्यांमध्ये ६८ पायाभूत सुविधा प्रकल्पांचे प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आले होते. यात वाहतुकीच्या नियोजनाकरिता रेल्वे, महामार्गाला जोडणारे रस्ते प्रामुख्याने बांधले जाणार आहेत. याशिवाय गोदावरीच्या घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरूस्ती केली जाणार आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये येणाऱ्या वाहनांचे नियोजन करण्याकरिता अनेक ठिकाणी वाहनतळ उभारली जाणार आहेत. या वाहनतळांना प्रमुख ठिकाणांशी जोडणारे रस्ते विकसित केले जातील. घाट बांधणी आणि दुरूस्तीकरिताही मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली आहे. मुकणे धरणावरील पंपिंग स्टेशनची क्षमता वाढविण्याकरिता व जलशुद्धीकरणाकरिता सुमारे ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर सुरक्षेकरिता सर्वत्र बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही यंत्रणेकरिता सुमारे ३७२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

नाशिकमधील ओझर विमानतळ विकासाकरिता ५७२ कोटी खर्चण्यात येणार आहेत. तर त्र्यंबकेश्वर परिसरातील पाणीसाठे पूर्णपणे भरण्याकरिता आणि गोदावरी नदी कायमस्वरूपी प्रवाहित राहण्याकरिता गौतमी गोदावरी धरण ते त्र्यंबकेश्वर उपसा प्रणाली योजनेकरिता सुमारे ३२९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. बहुतांश कामे नाशिक महानगरपालिका, त्र्यंबकेश्वर नगरपालिका, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआयडीसीच्या माध्यमातून केली जाणार आहेत.

## थोडक्यात...



### तुकाराम मुंढे यांचा कारवाईचा धडाका

मुंबई (स. गांवकरी) : अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार घेतल्यानंतर राज्यभरात कारवाईचा धडाका सुरू झाला आहे. पुणे, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर येथे केलेल्या धडक कारवाईमुळे भेसळ, कमी प्रतीच्या मालाची विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. निकृष्ट अन्न पदार्थांवर होत असलेल्या कारवाईचे जनसामान्यांतून कौतुक होत आहे. तुकाराम मुंढे यांनी मंगळवारी, २६ मे रोजी अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या आयुक्त पदाचा पदभार स्विकारला. पदभार स्विकारलेल्या दिवशीच पुणे जिल्ह्यातील निमगाव केतकी (ता. इंदापूर) येथे आंबे पिकविण्यासाठी रसायनांचा वापर केल्यावरून २०,००० रुपये किंमतीचे ८०० किलो आंबे जप्त करण्यात आले.




### तनपुरे यांचा शनिवारी भाजप प्रवेश निश्चित


अहिल्यानगर (स. गांवकरी) : विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अहिल्यानगर मतदारसंघातील उमेदवारीसाठी भाजपकडून माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचे नाव जवळपास निश्चित झाले असून तनपुरे यांचा ३० मे रोजी भाजप प्रवेश होणार आहे. भाजप पक्ष पदाधिकारी तसेच तनपुरे समर्थकांकडून याला दुजोरा मिळाला आहे. प्राजक्त तनपुरे हे शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांचे भाचे आहेत. प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे माजी आमदार आहेत. त्यांच्या भाजप प्रवेशाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा होत आहे. परंतु आता ते भाजपकडून विधानपरिषदेची निवडणूक लढवणार असल्याचे तसेच त्यांचा भाजप प्रवेशाचा मुहूर्त ३० मे रोजी ठरल्याची माहिती मिळाली. यासंदर्भात प्राजक्त तनपुरे यांच्याशी वारंवार संपर्क केला असता त्यांचा दूरध्वनी बंद असल्याचे आढळले. प्राजक्ता तनपुरे हे जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील मातब्बर नेते माजी खासदार प्राजक्त तनपुरे यांचे चिरंजीव आहेत. त्यांच्या आई डॉ. उषा तनपुरे राहुरी पालिकेच्या नगराध्यक्ष होत्या.

### मुंबईतून पुणे केवळ ४८ मिनिटांत

पुणे (स. गांवकरी) : देशातील महत्त्वाकांक्षी हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पांपैकी एक असलेल्या मुंबई-पुणे–हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. मुंबई–पुणे–हैदराबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) पूर्ण झाला आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगण राज्यातून हा मार्ग जाणार आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी तेलंगण सरकारकडे ९३ किलोमीटर क्षेत्रावरील जमीन रेल्वे विभागाने मागितली आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. या प्रस्तावित बुलेट ट्रेन मार्गामुळे पुणे ते हैदराबाद प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, सध्याच्या ८ ते १० तासांच्या रेल्वे प्रवासाऐवजी हा प्रवास अवघ्या १ तास ५५ मिनिटांत पूर्ण होऊ शकतो. याचबरोबर मुंबई ते पुणे हा प्रवास केवळ ४८ मिनिटांत पूर्ण करता येणार आहे.



# आश्रमशाळांच्या निधी खर्चाची चौकशी करण्याची मागणी!

- आदिवासी विकास विभाग आणि शासकीय आश्रम शाळांतील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह
- कोट्यवधींच्या निधीच्या वापराची चौकशी करण्याची मागणी!
- शासकीय आश्रमशाळा बनल्या गैरव्यवहाराचे केंद्र? कोट्यवधींच्या निधीवर गंभीर आरोप!
- देखभाल खर्च, साहित्य निर्लेखन आणि निधी वापरावर संशय; आश्रमशाळा पुन्हा चर्चेत!
- आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह; सखोल चौकशीची मागणी!






**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

(स. गांवकरी)

राज्यातील आदिवासी भागांच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या आदिवासी विकास विभागाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. आदिवासी समाजाचा विकास, विद्यार्थ्यांचे शिक्षण, शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ आणि रोजगार निर्मिती या उद्देशाने निर्माण झालेली यंत्रणा आता काही ठिकाणी गैरव्यवहार, दुर्लक्ष आणि प्रशासकीय अनियमिततेमुळे चर्चेत आली आहे.

माजी मंत्री स्वर्गीय मधुकरराव पिचड यांच्या कार्यकाळात आदिवासी भागांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर राज्यभरात शासकीय बेसिक आश्रमशाळा उभारण्यात आल्या. राजूर, आंबेगाव, घोडेगाव, ठाणे, जळगाव, धुळे, नंदुरबार, शहादा, पालघर, नागपूर, अमरावती आदी आदिवासी भागांमध्ये आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास, शेतकऱ्यांसाठी विविध योजना, गाई-म्हशी वाटप, शेतीपंप योजना आणि रोजगार निर्मितीचे अनेक उपक्रम राबविण्याचा शासनाचा संकल्प होता.

या योजनांमुळे अनेक तरुणांना रोजगार मिळाला, अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली. मात्र कालांतराने प्रशासनात राजकीय हस्तक्षेप वाढल्याचे आरोप होत आहेत. काही प्रकल्प अधिकाऱ्यांची नियुक्ती राजकीय आशीर्वादाने होत असल्याचा आरोप असून, शासकीय आश्रमशाळांच्या गुणवत्तेकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याची चर्चा सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, शासकीय आश्रमशाळांमध्ये दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी वर्ग केला जातो. मुख्याध्यापक आणि अधीक्षक यांच्या माध्यमातून विविध खर्चांसाठी निधी वितरित केला जातो. मात्र निधीचा वापर नेमका कसा होतो, खर्चाची अंमलबजावणी कितपत पारदर्शक आहे, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

आदिवासी विकास विभागातील काही अधिकारी आणि कर्मचारी शाळांवर नियुक्त असतानाही प्रत्यक्ष कार्यालयात कार्यरत असल्याचे प्रकार समोर आल्याचा दावा केला जात आहे. याबाबत पूर्वीही आवाज उठविण्यात आला होता. मात्र त्यावर ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नसल्याचे सांगितले जात आहे.

विशेषतः नाशिक विभाग आणि ठाणे विभागातील काही शासकीय आश्रमशाळांमध्ये जुने लोखंडी साहित्य, पत्रे आणि इतर वस्तूंच्या निर्लेखन प्रक्रियेमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. काही ठिकाणी साहित्य विक्रीसाठी आवश्यक जाहिरात प्रक्रिया न राबविता परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याचा दावा केला जात आहे. तसेच कार्यकारी अभियंता, उपअभियंता, मुख्याध्यापक आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमतातून मोठ्या आर्थिक व्यवहारांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप समोर येत आहे. शासकीय तिजोरीत जमा व्हावयाची रक्कम योग्य प्रकारे जमा झाली का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. याशिवाय आश्रमशाळांमधील हजेरीपत्रक, शैक्षणिक नोंदी, शिक्षकांच्या नियुक्त्या, वेतन प्रक्रिया, खर्चाचे बिल आणि विविध प्रशासकीय कामकाज यांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे. काही शाळांमध्ये आर्थिक व्यवहारांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

आश्रमशाळांमधील मुलींच्या वस्तीगृहांबाबतही अनेक मुद्दे समोर येत आहेत. मुलींच्या सुरक्षिततेसाठी विविध समित्या अस्तित्वात असतानाही काही घटनांवर योग्य पातळीवर कारवाई होत नसल्याची तक्रार आहे. महिला रेक्टर आणि संबंधित जबाबदार अधिकारी असताना प्रशासकीय अधिकारांचा वापर नेमका कशा पद्धतीने केला जातो, याबाबतही प्रश्न निर्माण झाले आहेत. दुसरीकडे आश्रमशाळांचे निकाल समाधानकारक दिसत असले तरी त्यामागे सर्व शिक्षकांचे योगदान असते. मात्र यशाचे श्रेय केवळ वरिष्ठ पातळीवर मर्यादित राहते, अशी भावना काही शिक्षकांमध्ये असल्याचे बोलले जात आहे.

शासनाने नियुक्त केलेल्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास राहणे बंधनकारक असतानाही काही अधिकारी आणि कर्मचारी शहरी भागात वास्तव्यास असल्याचेही आरोप समोर आले आहेत. त्यामुळे प्रशासनातील नियंत्रण आणि देखरेखीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

प्रत्येक आश्रमशाळेला देखभाल आणि दुरुस्ती खर्चासाठी दरवर्षी निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र या निधीचा प्रत्यक्ष वापर किती प्रभावीपणे केला जातो, याची पारदर्शक माहिती सार्वजनिक होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी या संपूर्ण प्रकरणात लक्ष घालून व्यापक चौकशी करावी, संबंधित आर्थिक व्यवहार, शैक्षणिक व्यवस्थापन, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे प्रश्न आणि निधी वापराची पडताळणी करावी, अशी मागणी विविध स्तरातून होत आहे.

दरम्यान, आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो आहे का, शासकीय आश्रमशाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र ठरत आहेत का, आणि निधीचा वापर नियमानुसार होतो आहे का, याचा संपूर्ण राज्यस्तरीय आढावा घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### श्री देवी अंबिका ट्रस्टला ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा

पारनेर (स. गांवकरी) : मंगळवार दि. २६ मे २०२६ पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथील श्री देवी अंबिका ट्रस्टला ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळावा यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला असून या प्रयत्नांना आता यश मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. संबंधित प्रस्तावाची मंजुरी अंतिम टप्प्यात पोहोचली असून यासंदर्भात आज आमदार काशिनाथ दाते सर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत तसेच देवीभोयरे गावच्या शिष्टमंडळाने ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ना. जयकुमारजी गोरे यांची मुंबई येथे भेट घेतली. यावेळी आमदार दाते सर यांनी देवीभोयरे येथील श्री देवी अंबिका देवस्थान हे संपूर्ण देशातील गोसावी समाजाचे प्रमुख श्रद्धास्थान असल्याचे सांगितले. वर्षभरात लाखो भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. मात्र सध्या ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा असल्याने निधीच्या मर्यादा येत असून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या देवस्थानास ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले.

### पुण्यातील विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये चमकदार कामगिरी

पुणे (स. गांवकरी) : विज्ञान ऑलिम्पियाड फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या ऑलिम्पियाड स्पर्धांपैकी एक असलेल्या एसओएफ ऑलिम्पियाड २०२५-२६ मध्ये पुण्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. विविध विषयांच्या स्पर्धांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवत विद्यार्थ्यांनी शहराचा नावलौकिक वाढविला आहे. भारती विद्यापीठ रवींद्रनाथ टागोर उत्कृष्टता विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी आर्य वैभव कुलकर्णी याने आंतरराष्ट्रीय इंग्रजी ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले. तसेच एसएनबीपी आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता अकरावीचा विद्यार्थी देव सक्सेना याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश संपादन केले. विबग्योर उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सहावीचा विद्यार्थी अर्जुन डोंगरवार याने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले, तर अक्षरा आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता आठवीचा विद्यार्थी अरमान गुहा याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश मिळवले. सर्व विद्यार्थ्यांना सुवर्णपदके, प्रमाणपत्रे आणि विशेष प्रावीण्य गौरवपत्र प्रदान करण्यात आले. यंदाच्या एसओएफ ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये पुण्यातील तीन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे त्यांच्या शाळांबरोबरच संपूर्ण पुणे शहराचा गौरव वाढला असून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे. नवी दिल्ली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात आयोजित २८ व्या एसओएफ आंतरराष्ट्रीय वार्षिक पुरस्कार सोहळ्यात या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विजय बिश्नोई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



## एम आय टँकसाठी माजी आमदारांची सुनेत्रा पवारांकडे धाव

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री मा.सुनेत्रा अजित पवार यांची जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुल बेनके यांनी आपल्या आदिवासी कार्यकर्तेसह भेट घेऊन कोपरे मांडवे बंधाऱ्यासंदर्भात सविस्तर चर्चा केली.यावेळी बंधाऱ्याच्या सर्व तांत्रिक बाबींवरसकारात्मक चर्चा होऊन आवश्यक त्रुटी दूर करण्यात आल्या. बंधाऱ्याच्या सर्वेक्षणासाठी डीपीसी मधून २५ लाखांचा रु. निधी देण्याचे आश्वासन मा. सुनेत्रा पवार यांनी दिले असून, पुढे ५० MCFT क्षमतेच्या एम आय बंधाऱ्यासाठी आवश्यक तो संपूर्ण निधीदेखील उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या महत्त्वपूर्ण बैठकी साठी माजी जिल्हा परिषद सदस्य बबन तांबे,अंकुश आमले,पंचायत समिती सदस्य तुषार थोरात,संदीप माळी,माजी सरपंच कोपरे भीमराव मुठे तसेच कार्यकारी संचालक धुमाळ साहेब उपस्थित होते. कोपरे मांडवे परिसराच्या पाणी प्रश्नासाठी सकारात्मक पाऊल उचलल्याबद्दल सुनेत्रा पवार,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,खासदारडॉ. अमोल कोल्हे आणि धुमाळ साहेब यांचे आदिवासी समाजाने मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहे.

## देवीभोयरे-शिवडोह लिंक कॅनॉल कामाला गती

**जलसंपदामंत्र्यांकडून तातडीच्या कार्यवाहीचे आदेश**



पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या देवीभोयरे- शिवडोह लिंक कॅनॉल प्रश्नावर आज महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून या प्रश्नाला अखेर गती मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. देवीभोयरे व वडझिरे परिसरातील शेतकऱ्यांनी लिंक कॅनॉलचे काम तातडीने मंजूर करून सक्तीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करत प्रकल्प मार्गी लावावा, या मागणीसाठी उपोषणाचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासन व शासन स्तरावर तातडीच्या हालचाली सुरू झाल्या.

आज कृष्णा खोरे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अक्षय बरकले यांनी संबंधित शेतकऱ्यांना मंचर येथे चर्चेसाठी बोलावून घेतले. यावेळी पंधरा दिवसांच्या आत भूसंपादन प्रक्रियेबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. यानंतर या प्रश्नाला अधिक गती मिळाली. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने यापूर्वी जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. शेतकऱ्यांच्या अडचणी व पाण्याचा गंभीर प्रश्न लक्षात घेऊन दाते सरांनी शासन दरबारी वेळोवेळी पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटीलांनी देवीभोयरे व वडझिरे येथील नागरिकांसमोरच मुख्य अभियंता चोपडे व धुमाळ यांना लिंक कॅनॉलचे काम तातडीने मंजूर करून सक्तीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करत काम मार्गी लावण्याचे स्पष्ट आदेश दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, अंबिका माता ट्रस्ट अध्यक्ष शिवाजीराव जाधव, विश्वनाथ गाजरे गुरुजी, मा. उप सरपंच विकास सावंत, बाबुराव मुळे, व्हा. चेअरमन गोपीचंद बेलोटे, मा. उपसरपंच दत्तात्रय दौलत बेलोटे, सुभाष किसन बेलोटे, बाबुराव एकनाथ बेलोटे, अक्षय राजाराम बेलोटे, भाऊसाहेब पोपट सरडे, कमलाकर लहू बेलोटे, यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

> मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व ग्रामस्थांचे संवेदनशील प्रश्न, पाणी, सिंचन, शेती व विकासकामांशी संबंधित प्रश्न केवळ बैठकीपुरते मर्यादित न ठेवता संबंधित विभागांकडे सातत्याने माझा पाठपुरावा आहे, देवीभोयरे-शिवडोह लिंक कॅनॉलसारखा रखडलेला प्रश्न मार्गी लागण्यासाठी शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवत जलसंपदामंत्री विखे पाटीलांशी सातत्याने चर्चा केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना हे काम तातडीने मंजुर करुन मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या, मतदारसंघातील नागरिकांना न्याय मिळावा, शेतीला पाणी मिळावे आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा यासाठी माझा संघर्ष असेल.
> **- आमदार काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

## कोपरे-मांडवे पाणी योजनेच्या सर्वेक्षणासाठी रु.२५ लक्ष ची मागणी, सर्वेक्षण निधी होणार उपलब्ध?

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



जुन्नर मतदार संघातील मौजे कोपरे-मांडवे ही आदिवासी क्षेत्रातील गावे सह्याद्रीचे डोंगर रांगांमध्ये दुर्गम भागात आहेत. त्या ठिकाणी पिण्यासाठी तसेच शेतीसाठी पाण्याची व्यवस्था देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखिल अद्यापपर्यंत झालेली नाही.त्यामुळे त्या भागात मोठा रोष निर्माण झाला आहे.मौजे कोपरे-मांडवे येथे धरण होणे बाबत वारंवार मागणी आहे. तथापि पाणी उपलब्धताचे कारणामुळे विलंब होत आहे. आता ' पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडील गोदावरी कृष्णा खोरे मध्ये वळविणेची कामे मोठ्या प्रमाणात होत आहे त्याद्वारे पाणी उपलब्ध होणार असल्याने कोपरे मांडवे बंधाऱ्या चे सविस्तर सर्वेक्षणाचे काम कृष्णा व गोदावरी महामंडळा मार्फत तातडीने हाती घेणेत यावे त्यासाठी रु. २०-२५ लक्ष निधीची तरतूद महामंडळाचे बिगर सिंचन निधीमधून होऊन धरणाचे कामास गती देण्यात यावी. त्यामुळे जुन्नर तालुक्यातील ४ गावे कोपरे,मांडवे,मुथाळणे, जांभुळशी व अकोले तालुक्या तील फोफसंडी,खेतेवाडी या दुर्गम आदिवासी क्षेत्रातील माणसांच्या व जनावरांच्या पाण्याचा तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. तरी मौजे कोपरे-मांडवे धरणाचा प्रश्न मार्गी लावावा ही विनंती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना केली आहे.




## पीएमजीएसवाय रस्त्याची दोन वर्षातच दुरवस्था

**गोसराने-जयपूर-गंगापूर-कनाशी मार्गाची वाट, 5 वर्षे देखभालीचा करार फक्त कागदावर**

- खड्डे, उखडलेले बोर्ड, कोसळलेले बॅरिकेड्स
- ठेकेदारावर कारवाई करा, अन्यथा काळ्या यादीत टाका - नागरिकांची मागणी



कनाशी : (स. गांवकरी)

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या गोसराने-जयपूर-गंगापूर-कनाशी या रस्त्याची अवघ्या दोन वर्षांतच चाळण झाली आहे. पाच वर्षे देखभाल-दुरुस्तीची हमी असतानाही ठेकेदाराने रस्त्याकडे ढुंकूनही पाहिले नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रजिमा-08 ते गोसराने, जयपूर, गंगापूर रस्ता सा.क्र. 0/000 ते 6/600 ची सुधारणा या कामासाठी 307.66 लाख रुपये मंजूर होते. दि. 01/12/2021 रोजी काम सुरु होऊन 18 महिन्यांत म्हणजेच मे 2023 पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित होते.

हे काम आर. सी. शिरसाठ इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक या कंपनीने केले आहे. काम पूर्ण झाल्यानंतर 5 वर्षे देखभाल-दुरुस्तीची हमी ठेकेदाराचीच आहे, असे बोर्डवर स्पष्ट नमूद आहे. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती भयावह आहे.

6.600 किमी लांबीच्या या रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत. डांबर उखडून खडी बाहेर आली आहे. अनेक ठिकाणी रस्त्याच्या बाजूचे बॅरिकेड्स, दिशादर्शक बोर्ड, गावाच्या नावाचे फलक पायासकट उन्मळून पडले आहेत. गंगापूर येथील धरणाच्या कोपऱ्याजवळील वळणावर लावलेला गंगापूर गावाच्या नावाचा मोठा बोर्ड पायासहित उलटा पडला आहे. किलोमीटरचे दगडही अनेक ठिकाणी ढासळले आहेत. पावसाळ्यापूर्वी डागडुजी न झाल्यास रस्ता पूर्णपणे वाहून जाण्याची भीती आहे. रस्त्याच्या बाजूला लावलेल्या बोर्डवर 5 वर्षे दोषदायित्व कालावधीतील देखभाल दुरुस्तीचा तपशील दिला आहे. झाडेझुडपे काढणे, पावसामुळे पडलेल्या चारींची दुरुस्ती करणे, बाजू पट्ट्यांची दुरुस्ती करणे, डांबरी पृष्ठभागाचे खड्डे व भेगा भरणे अशी कामे ठेकेदाराने दरवर्षी करणे बंधनकारक आहे. यासाठी 2023-24 ते 2027-28 या पाच वर्षांसाठी एकूण 18.30 लाख रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे. 2023-24 साठी 1.17 लाख, 2024-25 साठी 2.42 लाख, 2025-26 साठी 3.66 लाख रुपयांची तरतूद आहे. मात्र, एकदाही दुरुस्तीचे काम झाले नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत. "रस्ता बांधून दोन वर्षेही झाली नाहीत, तोपर्यंत पूर्ण उखडला. 5 वर्षे देखभालीची हमी घेतली मग ठेकेदार झोपला आहे का? अधिकारी पाहणी करायला येत नाहीत का? निधी लाटून काम बोगस केले आहे," असा संतप्त सवाल जयपूर येथील सामाजिक कार्यकर्ते दत्तू पवार यांनी केला.

> "या रस्त्याने शाळेची मुले, रुग्णवाहिका, शेतमाल वाहतूक होते. खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. ठेकेदाराने तातडीने दुरुस्ती करावी. संबंधित विभागाने कामाची चौकशी करून अशा ठेकेदारावर कारवाई करावी, अन्यथा त्याला काळ्या यादीत टाकावे," अशी मागणी कनाशी येथील माजी सरपंच रवींद्र बहिरम यांनी केली आहे. या संदर्भात कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. भारत सरकार ग्राम विकास मंत्रालयातर्फे अर्थसहाय्यीत असलेल्या या प्रकल्पाची अशी दुरवस्था होणे दुर्दैवी आहे. पावसाळ्यापूर्वी रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्यास नागरिक तीव्र आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

# जिल्हा परिषद ठाणेची अद्ययावत संगणकीकृत प्रणाली

## मोबाईल फ्रेंडली वेब बेस्ड प्रणालीमुळे ३ हजार ४६१ कर्मचाऱ्यांना लाभ

ठाणे : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद ठाणेच्या अर्थ विभागामार्फत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (Provident Fund) व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणारी संगणकीकृत प्रणाली अधिक अद्ययावत करण्यात आली असून, आता ही प्रणाली पूर्णपणे मोबाईल फ्रेंडली स्वरूपात कार्यरत करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात वर्गणी जमा करणे, खर्चाच्या नोंदी ठेवणे, व्याज परिगणना करून वार्षिक लेखे तयार करणे आदी सर्व प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पारदर्शक व कार्यक्षम रीतीने राबविण्यात येत आहेत.

जिल्हा परिषद ठाणेच्या अर्थ विभागामार्फत सन २००९-२०१० पासून सर्व्हर बेस्ड सॉफ्टवेअर प्रणालीद्वारे भविष्य निर्वाह निधी लेखे तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले होते. त्यानंतर सन २०१८-१९ पासून ही प्रणाली वेब बेस्ड करण्यात आली. आता सन २०२५-२६ मध्ये सदर प्रणालीमध्ये आवश्यक तांत्रिक बदल करून ती अधिक आधुनिक, सुरक्षित आणि कर्मचारी हिताची करण्यात आली आहे.

सदर प्रणाली कर्मचाऱ्यांच्या मोबाईलशी जोडण्यात आल्यामुळे कर्मचारी आता त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्याची माहिती मोबाईल ॲपद्वारे सहज पाहू शकतात. सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीतील भविष्य निर्वाह निधी लेखे कर्मचाऱ्यांना ॲपद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यापूर्वी वित्त विभागामार्फत कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी विवरणपत्राच्या छापील प्रती वितरित करण्यात येत होत्या. तथापि या प्रणालीमुळे डिजीटल स्वरुपात प्रिंट काढणे शक्य होणार आहे. प्राथमिक शिक्षकांसाठी ही प्रणाली अधिक सुलभ करण्यात आली असून, शालार्थ प्रणालीमध्ये तयार होणारी अनुसूची थेट इम्पोर्ट करून प्राथमिक शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात दरमहा वर्गणी जमा करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे वर्गणी जमा करण्यासाठी लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला असून कार्यपद्धती अधिक वेगवान व अचूक झाली आहे.

तसेच मुख्यालय व पंचायत समिती स्तरावरील आस्थापना शाखेतील कर्मचारी अनुसूचीनुसार थेट संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात मासिक वर्गणी जमा करू शकतात. यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ झाली आहे. भविष्य निर्वाह निधी योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या खात्यात मासिक वर्गणी जमा झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना एसएमएसद्वारे तत्काळ माहिती दिली जाते. त्यामुळे खात्यातील व्यवहाराबाबत कर्मचाऱ्यांना वेळेवर माहिती मिळत असून कर्मचारी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



श्रीगोंदा : रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस यांचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. घोगरगाव हरिपाठ मंडळ आणि श्रीराम भजनी मंडळ यांच्या वतीने हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून देवेंद्र शेटे उपस्थित होते. तसेच विद्यमान सरपंच सुजाता भोसले, सोसायटीचे चेअरमन प्रकाश बोरुडे, उपसरपंच डॉ. दिलीप भोस, जालिंदर उल्हारे, गवाजी राऊत, विश्वास बोरुडे, महेश बोरुडे, उत्तम धामणे, बाळासाहेब शेटे, अर्जुन देवा शेळके, भुजबळ सर, सुधीर तरटे, राजेंद्र तरटे, प्रशांत भोस आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### साळुंके यांच्या अश्वत्थ डिझाईन स्टुडिओला ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर येथील अश्वत्थ डिझाईन स्टुडिओचे आर्किटेक्ट रोहित साळुंके आणि सोनू साळुंके यांना ऐसा च्या नगरमधील कार्यक्रमात पुणे येथील चेलाराम हॉस्पिटलमधील लँडस्केप प्रोजेक्टसाठी ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड 2026 ने सन्मानित करण्यात आले.बेस्ट डिझाइन औटसाईड अहिल्यानगर सिटी या विभागात या प्रकल्पाला द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. या प्रकल्पामध्ये वेलनेस सेंटरच्या टेरेस लँडस्केपचे नियोजन व डिझाईन करण्यात आले असून, शांत व सकारात्मक वातावरण निर्मितीवर विशेष भर देण्यात आला होता.आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी ऐसाचे अध्यक्ष अभिजित देवि,सचिव भूषण पांडव,इंजि संजय चांदवले तसेच ऐसा चे सर्व पदाधिकारी, सदस्य व नगरकर उपस्थित होते. या यशाबद्दल अश्वत्थ डिझाईन स्टुडिओच्या टीमने क्लायंट,कन्सल्टंट,कॉन्ट्रॅक्टर तसेच प्रकल्पाशी संबंधित सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत.व त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### शेतकरी बांधवांनी डीएपी खतास पर्यायी खतांचा वापर करावा

ठाणे (स. गांवकरी) : राज्यात खरीप हंगामाची तयारी सुरू असून पेरणीपूर्व काळात रासायनिक खतांची मागणी वाढत आहे. विशेषतः डीएपी (Di-Ammonium Phosphate) खताला मोठ्या प्रमाणात मागणी असते. मात्र राज्यात डीएपी खताचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे उपलब्ध होत नसल्याने शेतकरी बांधवांनी डीएपी खतावर पूर्णपणे अवलंबून न राहता पर्यायी खतांचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. मागील तीन वर्षांत राज्यात खरीप हंगामादरम्यान सुमारे ४४ लाख मेट्रिक टन रासायनिक खतांचा वापर झाला असून त्यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश), संयुक्त खते आणि एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) खतांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य हे मृदा परीक्षण व जमीन आरोग्य पत्रिकांवर आधारित एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणालीच्या वापरात अग्रेसर राज्य मानले जाते. डीएपी खतामध्ये १८ टक्के नत्र आणि ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्ये असतात. मात्र डीएपी खताचा पुरवठा मर्यादित असल्याने पर्यायी स्फुरदयुक्त खतांचा वापर करणे आवश्यक ठरत आहे. कृषी विभागाने एसएसपी (Single Super Phosphate) खताचा वापर प्रभावी पर्याय म्हणून सुचविला आहे. एसएसपी हे देशांतर्गत उत्पादित खत असून त्यामध्ये १६ टक्के स्फुरदासोबत सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्येही उपलब्ध असतात. विशेषतः तेलबिया पिकांसाठी सल्फरयुक्त एसएसपी खत फायदेशीर ठरते.




### राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्काराने वाघमारे, राऊत, डॉ. चव्हाण सन्मानित

श्रीगोंदा (स. गांवकरी) : अजिंक्य सोशल फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय ‘महाराष्ट्र गौरव – शिक्षक रत्न’ पुरस्कार सोहळ्यात श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील उपक्रमशील शिक्षक राजेंद्र वाघमारे, संगिता राऊत आणि डॉ. संध्या चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले. पिंपरी-चिंचवड येथील लोकनेते लक्ष्मणराव जगताप सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज शिवाजी महाराज मोरे, डॉ. अशोक सोनवणे, डॉ. राजेंद्र मोरे, नगरसेवक ॲड. विनायक दादा गायकवाड, फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन पवार, उपाध्यक्षा संगिता भालेराव तसेच सदस्य बाळासाहेब राठोड यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. डॉ. संध्या विजय चव्हाण यांनी शिक्षणशास्त्र विषयात एम.फिल.च्या आठ आणि पीएच.डी.च्या पाच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी त्यांनी पाच पुस्तकांचे लेखन केले असून, त्यांचे सुमारे तीस संशोधनपर शोधनिबंध राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झाले आहेत. विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन, व्याख्याने, कृती कार्यशाळा, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन यांसारखे उपक्रम त्यांनी राबविले आहेत. राजेंद्र वाघमारे यांनी शाळेतील वंचित विद्यार्थ्यांसाठी बचत बँक, पाठांतर स्पर्धा तसेच उपस्थिती वाढविण्यासाठी बक्षीस योजना यांसारखे उपक्रम प्रभावीपणे राबविले. तर संगिता राऊत यांनी विद्यार्थ्यांचे झटपट वाचन, सुंदर हस्ताक्षर आणि मुलींसाठी आरोग्यविषयक चांगल्या सवयी विकसित करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन या तिघांना ‘शिक्षक रत्न’ पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आभार विश्वस्त बाळासाहेब राठोड यांनी मानले. पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात रक्ताचा भीषण तुटवडा

## जनकल्याण रक्तकेंद्राच्या कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यात रक्तपिशव्यांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात असल्याने रक्तपेढीमध्ये मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. मार्च,एप्रिल,मे हा तीव्र उन्हाळ्याचा महिना असल्याने या कालावधीमध्ये शिबिरे घेतली जात नसल्याने रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे.आपण समाजाचे देणे लागतो.या उद्देशाने जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मिस्त्री यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने करण्यात आले होते.




या रक्तदान शिबिरात जनकल्याण रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. या रक्तदान शिबिरात जनकल्याण रक्त केंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे,सहाय्यक प्रशासकीय अधिकारी स्मिता बडवे, अकाउंट ऑफिसर गजेंद्र सोनवणे,डॉ. गौरी जोशी,डॉ. गुलशन गुप्ता,डॉ. वसंत झेंडे,डॉ. हर्ष शाह,जनसंपर्क अधिकारी शरद बळे,अमित टकले,मयूर खरमाळे,किरण शिंदे, गणेश तनपुरे,सचिन शेडाळे, गौरव पठाडे,वेदांत हरिश्चंद्रे, रवींद्र साबळे,राहुल पुंड,गौरव बागल,आशिष लिमकर,किशोर यादव,अनिता कराळे,सुलभा पवळ आदी उपस्थित होते.

जनकल्याण रक्तकेंद्राच्या आवाहनाला प्रतिसाद देत विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,निवृत्त पोलीस अधिकारी भास्कर टेमकर,अँड.निनाद देव, रमाकांत दिघे,विजय चव्हाण आदींनी उस्फूर्तपणे रक्तदान केले. सागर उंडे म्हणाले,जिल्ह्यात सर्वत्र रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात असल्याने नागरिकांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून रक्तदानाच्या महान कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा.रक्त हे मानवनिर्मित आहे.रक्त हे कोणत्याही फॅक्टरी तयार होत नसल्याने प्रत्येकाने सामाजिक दायित्व म्हणून रक्तदान करून समाजकार्य हातभार लावावा. असे आवाहन जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने करण्यात येत आहे. जनकल्याण रक्त केंद्राने स्वेच्छा रक्तदात्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. तरी रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून रक्ताची समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

# आई आणि चिमुकलीचे सुखद पुनर्मिलन

डांग : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील 181 अभय महिला हेल्पलाईनवर एका महिलेचा फोन आला होता. महिलेने सांगितले की, तिच्या दोन वर्षांच्या मुलीला सासरच्या लोकांनी स्वतःकडे ठेवले असून तिला मुलीला भेटू किंवा परत घेऊन जाऊ दिले जात नाही. फोन मिळताच 181 अभयम टीम तात्काळ घटनास्थळी पोहोचली आणि संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली. चौकशीत असे समोर आले की, महिला आणि तिचे पती गेली तीन वर्षे एकत्र राहत असून त्यांना दोन वर्षांची मुलगी आहे. कौटुंबिक मतभेद आणि घरगुती किरकोळ कारणांमुळे घरात वारंवार वाद होत होते. गेल्या दोन दिवसांपासून महिलेला सासरच्या घरातून बाहेर काढण्यात आले होते तसेच तिच्या लहान मुलीला सासरच्या लोकांनी स्वतःकडे ठेवले होते. महिला मुलीला परत घेण्यासाठी गेली असता “मुलीवर आमचा हक्क आहे” असे सांगून मुलगी तिच्याकडे सोपवण्यात येत नव्हती. यानंतर 181 अभयम टीमने महिलेचे पती आणि सासरच्या लोकांचे समुपदेशन केले तसेच परिस्थिती शांततेने समजून घेण्याचा प्रयत्न केला. टीमने समजावून सांगितले की प्रत्येक महिलेला सन्मानाने आणि सुरक्षितपणे जगण्याचा अधिकार आहे. तसेच मुलांच्या हिताला आणि त्यांच्या योग्य संगोपनाला कायद्यानुसार विशेष प्राधान्य दिले जाते. विशेषतः लहान वयातील मुलांच्या संगोपनासाठी आईची भूमिका महत्त्वाची मानली जाते. कौटुंबिक वाद हे भांडण किंवा मतभेदाने नव्हे तर चर्चा, समजूतदारपणा आणि परस्पर सहमतीने सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.



# मादी बिबट्या अखेर पिंजऱ्यात जेरबंद, सुटकेचा निश्वास

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)

सापुतारा येथे गेल्या काही दिवसांपासून दहशत माजवणाऱ्या मादी बिबट्याला दक्षिण डांग वन विभागाच्या शामगहान रेंजच्या पथकाने यशस्वीरित्या पिंजऱ्यात पकडल्याने स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. दक्षिण डांग वन विभागाचे डी.सी.एफ. नीरजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शामगहान रेंजच्या आर.एफ.ओ. मंजुलाबेन ठाकरे यांच्या टीमने सापुताऱ्याच्या विविध भागात पिंजरे लावले होते. दरम्यान, रात्रीच्या वेळी शिकारीच्या शोधात भटकणारी मादी बिबट्या पिंजऱ्यात अडकली. उल्लेखनीय म्हणजे, काही दिवसांपूर्वी सापुतारा परिसरात एक खूंखार नर बिबट्याही पिंजऱ्यात पकडण्यात आला होता. हा नर बिबट्या आणि सदर मादी बिबट्या एकत्र फिरताना दिसत होते. बिबट्यांचे हे जोडपे सापुताऱ्याच्या जंगल परिसरात आणि आजूबाजूच्या भागात सतत वावरत होते तसेच पाळीव कुत्रे आणि घोड्यांवर हल्ले करत होते. सापुताऱ्यात बिबट्यांच्या वाढत्या हालचालींमुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे दक्षिण डांग वन विभागाच्या शामगहान रेंजने सतत मॉनिटरिंग आणि ट्रॅपिंग मोहीम राबवली. अखेर मादी बिबट्याही पिंजऱ्यात अडकल्याने स्थानिक नागरिक आणि पर्यटकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट झाली आहे.दक्षिण डांग वन विभागाच्या शामगहान रेंजच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वनक्षेत्र धोक्यात; हजारो हेक्टर जंगल आगीच्या भक्ष्यस्थानी

## वन विभाग व ग्रामस्तरावरील समित्यांचे दुर्लक्ष; तातडीने उपाययोजना राबविण्याची गरज



संगमनेर खुर्द : (स. गांवकरी)

संगमनेर तालुक्यात यंदाच्या आग हंगामात मोठ्या प्रमाणावर वनवणव्यांची मालिका सुरू असून, मौजे निमगाव खुर्द, सावरचोळ, (मेंगाळवाडी) मिर्जापुर, धांदरफळ खुर्द, पिंपळगाव कोंझिरा, पेमगिरी, निमज, नांदुरी दुमला आदी गावांतील हजारो हेक्टर वनक्षेत्र आगीच्या भस्मसात झाले आहे. या आगीमुळे वनसंपत्तीचे मोठे नुकसान झाले असून, जैवविविधतेलाही गंभीर धोका निर्माण झाला आहे.

प्राथमिक पाहणीत वन विभागाचे तसेच स्थानिक ग्रामस्थांचे दुर्लक्ष स्पष्टपणे दिसून येत आहे. प्रत्येक गावात संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन असल्या, तरी त्या निष्क्रिय अवस्थेत असल्याचे चित्र आहे. दिवसेंदिवस वनसंवर्धनाबाबतचा लोकांचा दृष्टिकोन ढासळत असल्याचे जाणवत आहे. राज्य शासन ‘जल, जंगल, जमीन’ संवर्धनासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करत असताना, त्याचा अपेक्षित परिणाम प्रत्यक्षात दिसत नाही, ही बाब चिंताजनक आहे. विशेषतः आग हंगामात आवश्यक ती खबरदारी घेतली जात नसल्याने वनवणव्यांचे प्रमाण वाढत आहे. वनतज्ज्ञांच्या मते, आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी काही मूलभूत उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. यामध्ये दरवर्षी फायर लाईन (जाळ रेषा) तयार करणे, ग्रामस्तरावर अग्नीरक्षकांची नियुक्ती करणे, तसेच जाणीवपूर्वक आग लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे यांचा समावेश होतो. तसेच, ग्रामस्थांची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. कोणताही विभाग प्रत्येक ठिकाणी त्वरित पोहोचू शकत नाही, त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून वन विभागाच्या टोल-फ्री क्रमांक १९२६ वर माहिती द्यावी. माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवली जाते, असे वन विभागाने स्पष्ट केले आहे. संगमनेर तालुक्यातील सुमारे ३५,००० हेक्टर वनक्षेत्र सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासन, वन विभाग आणि स्थानिक नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे.गावागावातील ग्रामसभेमध्ये वनाधिकाऱ्यांनी जनजागृती करणे, काळाची गरज आहे. जंगल म्हणजे केवळ झाडे नव्हेत, तर एक समृद्ध जैवविविधतेचा खजिना आहे. त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. चला, आपण सर्व मिळून आपल्या वनसंपत्तीचे रक्षण करूया आणि पुढील पिढीसाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करूया.

### वनविभाग प्रशासनाकडून दुर्लक्ष?

संगमनेर वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. फोन न उचलणे आणि घटनांकडे दुर्लक्ष करणे ही गंभीर बाब असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन कार्यपद्धतीत सुधारणा करणे गरजेचे आहे.

# गाईला ‘राष्ट्रीय पशू’ घोषित करण्याची शिफारस करा

## नगरमधील मुस्लिम समाजाची मागणी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

गुरुवारी (दि.२८ मे) रोजी साजरी होणाऱ्या बकरी ईद (ईद-उल-अजहा) सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, तसेच भारताच्या कृषीप्रधान संस्कृतीत गाईला असलेले महत्त्व लक्षात घेऊन तिला ‘राष्ट्रीय पशू’ घोषित करण्याबाबत केंद्र सरकारकडे सकारात्मक शिफारस पाठवावी, अशी मागणी मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी, शांतता समितीचे सदस्य आणि आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. शहरात बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीदरम्यान मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांना निवेदन दिले. यावेळी आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, माजी नगरसेवक समद खान, मौलाना शफीक कासमी, सामाजिक कार्यकर्ते खालिद शेख, अकबर अली शेख, नईम सरदार, संजू जहागीरदार, मोहसिन शेख यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बकरी ईद सण शांततेत आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावा, यासाठी मुस्लिम समाज प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल. मात्र सणाच्या काळात काही समाजकंटक सोशल मीडियावर खोट्या किंवा जुन्या पोस्ट व्हायरल करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सायबर पोलिसांनी आधीपासूनच लक्ष ठेवून अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



तसेच कायदेशीर पद्धतीने मटणाची वाहतूक किंवा वाटप करणाऱ्या नागरिकांना केवळ संशयाच्या आधारावर अडवून कायदा हातात घेणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या समाजकंटकांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली. मुख्य नमाजच्या वेळी शहरातील ईदगाह आणि प्रमुख मशिदी परिसरात पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आवाहनही प्रशासनाला करण्यात आले आहे. आरोग्य, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांबाबतही निवेदनात विशेष मुद्दे मांडण्यात आले. कुर्बानीनंतर निर्माण होणारा कचरा आणि अवशेष तात्काळ उचलण्यासाठी महानगरपालिकेने विशेष पथके व घंटागाड्या तैनात कराव्यात, तसेच दुर्गंधी टाळण्यासाठी जंतुनाशक फवारणी युद्धपातळीवर करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. सणाच्या काळात संबंधित भागात अखंडित पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा सुरळीत राहावा, यासाठीही प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निवेदनात नमूद आहे.

मुस्लिम समाजाच्या वतीने प्रशासनाला हेही आश्वासन देण्यात आले की, मशिदींमधून नागरिकांना नियमांचे पालन, स्वच्छता राखणे आणि शांतता टिकवून ठेवण्याचे आवाहन करण्यात येईल. प्रशासनाने अधिकृत अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक आणि कचरा व्यवस्थापनाबाबत पूर्वनियोजन केल्यास समाजाकडूनही पूर्ण सहकार्य दिले जाईल, असे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.

निवेदनातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे गाईला ‘राष्ट्रीय पशू’ घोषित करण्याची मागणी हा ठरला. भारताच्या कृषीप्रधान संस्कृतीत ‘गोमाता’ हे कोट्यवधी हिंदू बांधवांचे श्रद्धास्थान असून मुस्लिम समाज त्या भावनांचा पूर्ण आदर करतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. समाजात कायमस्वरूपी शांतता, बंधुभाव आणि परस्पर विश्वास वृद्धिंगत व्हावा, तसेच गोवंश रक्षणाला चालना मिळावी यासाठी गाईला ‘राष्ट्रीय पशू’चा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर बाब अत्यंत संवेदनशील आणि राष्ट्रहिताची असल्याने अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाकडे यासंदर्भात सकारात्मक शिफारस पाठवावी, अशी विनंती शिष्टमंडळाने केली आहे.

# ओतूर शहरातून पोलिस प्रशासनाचा रूट मार्च (संचलन)



**ओतूर : (स. गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस स्टेशन हद्दीत बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे तसेच पोलिस दलाचा वचक व प्रभाव होण्यासाठी पोलिस प्रशासनाच्या वतीने दि. २७ मे रोजी सकाळी १० ते ११.३० दरम्यान ओतुर शहरातून रूट मार्च (संचलन) काढण्यात आला होता. विविध समाजांमध्ये सलोखा राहावा आणि सण शांततेत पार पडावा हा मुख्य प्रयत्न या रूट मार्चचा असतो. संवेदनशील भाग आणि गावातील मुख्य रस्त्यांवरून संचलन करून पोलिस बंदोबस्ताची स्थिती तपासली जाते. नागरिकांशी संवाद साधत पोलिस नागरिकांना निर्भयपणे सण साजरा करण्याचे आवाहन करतात आणि अफवांवर विश्वास न ठेवण्याचा संदेश दिला यातून दिला जातो. ओतूर पोलिस स्टेशन पासून देवगल्ली, जामा मस्जिद, पांढरा मारुती चौक, ग्रामीण रुग्णालय, मोरे चौक, एसटी बस स्थानक पासून ब्राह्मणवाडा रोड, रामकृष्ण हरी चौक पासून पुन्हा ओतूर पोलिस स्टेशन या मार्गाने रूट मार्च काढण्यात आला होता. त्यामध्ये १ सहाय्यक पोलिस निरीक्षक, २ उपनिरीक्षक, २ फौजदार, २० पोलिस अंमलदार व १२ होमगार्ड सहभागी झाले होते. अशी माहिती ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली.

# शासकीय माध्यमिक आश्रम शाळा कोहणेचा दहावीचा निकाल १०० टक्के


**कोहणे : (स. गांवकरी)**


शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, कोहणे येथील मार्च २०२६ मध्ये झालेल्या एस.एस.सी. (दहावी) परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतून एकूण ३४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ११ विद्यार्थ्यांनी प्राविण्यासह यश मिळविले असून १४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. गुणानुक्रमे प्रथम पाच विद्यार्थ्यांमध्ये प्रणिता विठ्ठल दिघे हिने ८६.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रतीक्षा इंदू नाडेकर हिने ८५.६० टक्के गुणांसह द्वितीय, सानिका सखाराम घोडे हिने ८४.६० टक्के गुणांसह तृतीय, अर्चना ज्ञानदेव भांगरे हिने ८१.४० टक्के गुणांसह चौथा तर वैष्णवी गोपीनाथ घोडे हिने ८०.२० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक मिळविला. या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक, शिक्षक, अधीक्षक, अधीक्षिका, वर्ग ४ कर्मचारी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. शाळेच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.


# तरुणावर प्राणघातक हल्ला


**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**


शहरातील बिशप लॉईड कॉलनीतील मकासरे लॅब समोर पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर लोखंडी पाईप आणि धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जय रवी खरात वय २७, व्यवसाय फायनान्स, रा. बिशप लॉईड कॉलनी हा तरुण घरात असताना मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. जुन्या वादाचा राग मनात धरून आरोपी प्रवीण मधुकर सोनवणे याने जय खरात याला गाठले.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

## आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



२५ गौरवमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code 5480

### मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
|---|---|---|
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 | 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा

### धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज

के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी सर्वोत्कृष्ठ शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 | 9975276670

### आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code 05662

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस ॲण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 | 9922545516
9765431168 | 7028724045 | 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ ॲक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

### मातोश्री गंगुबाई शिंदे ॲक्यूपंक्चर कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल

डिप्लोमा इन ॲक्युपंक्चर थेरपी (DAT)

| | |
|---|---|
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व ॲक्युपंक्चरिस्ट
- ॲक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 | 7028724045

||सुजाता|| अकोले 9970095289

# थोडक्यात पण महत्वाचे



## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौंडी रथयात्रेचे जलपुजन

नवीन नांदेड (स. गांवकरी) : विष्णुपूरी काळेश्वर येथील गोदावरी नदी येथुन जल यात्रा दि.26 मे रोजी नांदेड जिल्हा प्रमुख अ‍ॅड.शिवाजीराव व विश्वस्त शंकरराव हंबर्डे व पदाधिकारी यांच्या हस्ते जलपुजन करून यात्रेच्या शुभारंभ करण्यात आला. श्री मल्हारी मार्तंड खंडोबाचे माळेगाव ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मातेच्या चौंडी रथयात्रा ता.जामखेड गोदावरी नदी ते सीनानदी जल यात्रा सुरुवात केली जशी महाराष्ट्र सरकारने गोदा ते नर्मदा अशी जल यात्रा काढून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मातेच्या इतिहासाला उजाळा दिला असून ,नांदेड जिल्हा सकल धनगर समाजाचा आधार स्तंभ अँड शिवाजीराव यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले, यावेळी काळेश्वर महादेव मंदिराचे विश्वस्त शंकरराव हंबर्डे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संभाजीराव धुळगुंडे, प्रा.मुरहरी कुंभारगावे रथयात्रा दिंडीचे प्रमुख इंजी. बालाजीराव काळे, माजी सरपंच पिराजी धुळगुंडे स व लक्ष्मण यांच्या सह सेवक गोविंद गोरे कौठा नांदेड यांची उपस्थिती होती.



## विविध प्रश्न, मागण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी, नागरिक, सिंचनाच्या विविध प्रलंबित प्रश्न आणि विकासात्मक मागण्यांसंदर्भात मुंबई येथे मंत्रालयात महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री अतुल सावे यांची भारतीय जनता पार्टीचे हदगाव तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी भेट घेतली, या मान्यवरांच्या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान त्यांनी हदगाव तालुक्यातील जनतेच्या आणि भागाच्या विकासाशी संबंधित विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन मंत्री महोदयांना सुपूर्द केले. हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शेतकरी बांधवांचे प्रश्न, महसूल, ग्राम विकास कृषी जलसंपदा विभागाशी संबंधित प्रलंबित कामे आणि स्थानिक विकासाला गती देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध विषयांवर भेटीदरम्यान चर्चा केली. तालुक्यातील जनहिताचे प्रश्न तातडीने मार्गी लागावेत, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. या प्रसंगी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री अतुल सावे यांनी हदगाव तालुक्यातील सर्व मागण्यांवर सहानुभूतीपूर्वक विचार करून संबंधित विभागाच्या वतीने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे ठोस आश्वासन यावेळी दिले असल्याची माहिती भागवत देवसरकर यांनी दिली. या भेटीमुळे हदगाव तालुक्यातील अनेक प्रलंबित विकासकामांना आणि प्रश्नांना आता वेग मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. यावेळी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे परमेश्वर काळे, कैलास चव्हाण, दीपक पटणे आदी उपस्थित होते.



## निळकंठेश्वर ट्रॅव्हल्सने दोन मोटारसायकल स्वाराला फरपटत नेले

नायगाव (स. गांवकरी) : शहरालगत देगाव शिवारातील साई पेट्रोलपंपाजवळ मंगळवारी सकाळी साडेदहा ते अकराच्या सुमारास काळाने घाला घातला. भरधाव वेगाने देगलूर-नांदेड धावणाऱ्या निळकंठेश्वर खाजगी ट्रॅव्हल्सने रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीस्वारांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोघांना ट्रॅव्हल्सने जवळपास 100 मीटर फरफटत घासत नेले या भीषण अपघातात देगाव येथील पप्पू बालाजी विभुते, वय 45 असुन माधव चिंचलवाड, वय 47 हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. माधव चिंचलवाड यांची प्रकृती चिंताजनक असून डोक्याला व छातीला पायाला गंभीर मार लागला आहे. जोरदार लागल्याने पप्पू विभुते ची तब्येत गंभीर व चिंताजनक असल्याचे बोलण्यात येत आहे दोघांनाही तत्काळ शासकीय रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथे हलविण्यात आले आहे. नायगाव तालुक्यात जवळपास दहा ते पंधरा खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्या मुखेड-नांदेड व देगलूर-नांदेड मार्गावर धावतात. प्रवासी मिळवण्यासाठी या ट्रॅव्हल्सचालकांमध्ये जीवघेणी स्पर्धा लागते. प्रत्येक वाहनाला ओव्हरटेक करत, भरधाव वेगाने गाड्या हाकल्या जातात. एसटी बसला प्रवासी मिळू नयेत म्हणून ट्रॅव्हल्सवाले जीव धोक्यात घालून गाड्या पळवतात, असा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत.

## नांदेड जिल्ह्यात ‘शून्य कुष्ठरोग मोहिमेला’ प्रारंभ

- ८९२ गावांमध्ये विशेष सर्वेक्षण ; आतापर्यंत ८५ हजारहून अधिक नागरिकांची तपासणी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालनालयाच्या निर्देशानुसार, शाश्वत विकास ध्येयांतर्गत गाव पातळीवर शून्य कुष्ठरोग प्रलंबन साध्य करण्यासाठी नांदेड जिल्ह्यात शून्य कुष्ठरोग मोहिमेची’यशस्वी सुरुवात करण्यात आली आहे. ही मोहीम जिल्हाधिकारी राहुल कर्डिलेआणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात आहे. या मोहिमेचे सूक्ष्म नियोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी व सहसंचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग डॉ. बालन यांच्या नेतृत्वात करण्यात आले असून, जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा यासाठी पूर्ण ताकदीने कार्यरत आहे. आवाहन: कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. सुरुवातीच्या काळातच याचे निदान झाल्यास पुढील होणारे शारीरिक व्यंग टाळता येते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या भागात येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना योग्य माहिती देऊन सहकार्य करावे आणि मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# ग्रीनफील्ड मार्गाच्या भूसंपादनाबत शेतकऱ्यांसोबत : खा. वाकचौरे

कोपरगाव : (स. गांवकरी)

सुरत चेन्नई या ग्रीनफिल्ड रस्त्याच्या शेतकऱ्यांच्या लढ्यासाठी आपण शेतकऱ्यांबरोबर असून तो लढा शेतकऱ्यांनी सणादशील मार्गांनी लढावा लागेल आपण लवकरच केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांचेशी बोलून मार्गी लावणार असल्याचे आश्वासन शिर्डीचे खा.भाऊसाहेब वाकचौरे यांनी संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथे बोलताना केले आहे. सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला २०२६ मध्ये गती देण्यात आली असून,सोलापूर आणि नाशिकसह विविध जिल्ह्यांतून ही प्रक्रिया सुरू आहे.केंद्र सरकारच्या आर्थिक घडामोडींच्या मंत्रिमंडळाने या प्रकल्पाला मान्यता दिल्यानंतर,सोलापूर जिल्ह्यातील ५८ गावांतील भूसंपादन प्रक्रियेला गती मिळाली आहे.



बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर मोबदल्याची रक्कम जमा करण्याची कार्यवाही एनएचआय स्तरावर प्रलंबित प्रक्रियेतून मार्गी लावली जात आहे.काही भागांत, विशेषतः नाशिक जिल्ह्यातील सिन्नर,संगमनेर तालुक्यात,अपुरा मोबदला आणि चुकीच्या नोंदींमुळे शेतकऱ्यांनी भूसंपादनास विरोध दर्शविला आहे. तसेच,काही ठिकाणी महसूल प्रशासनासोबत समन्वयाच्या अभावी प्रक्रिया अधांतरी राहिल्याचे समोर आले आहे.हा महामार्ग आता नाशिकजवळून सुरू होण्याची शक्यता असून,त्याबाबतचे फेरबदल विचाराधीन आहेत.प्रकल्पाचे स्वरूप: हा महामार्ग ६ पदरी असणार असून,त्याचा ताशी वेग १२० किमी नियोजित आहे.या पार्श्वभूमीवर आज संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे परिसरातील प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची बैठक आज श्रीराम मंदिर सभागृहात आयोजित केली होती.त्यावेळी ते बोलत होते.

सदर प्रसंगी संगमनेर पंचायत समितीचे माजी सभापती अविनाश सोनवणे,तळेगावचे सरपंच प्रभाकर कांदळकर,वडझरीचे सरपंच संदीप गोरडे,अमृतवाहिनी बँकेचे संचालक किसनराव सुपेकर,डॉ.आर.पी.दिघे, प्रा.किसनराव दिघे, अशोक सातपुते, मच्छिंद्र दिघे, चिंचोली येथील कार्यकर्ते महेंद्र सोनवणे आदीसह तळेगाव दिघे,लोहारे,मीरपूर,वडझरी खुर्द,वडझरी बुद्रुक,चिंचोली आदी परिसरातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

त्यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की,"२०१८ चे दर शासनाने लावू नये त्यासाठी आपण प्रयत्न करू,वेळ प्रसंगी आपल्याला न्यायालयीन पायरी चढावी लागू शकते.समृद्धी महामार्गाच्या वेळी कोपरगाव शेतकऱ्यांनी मोठा विरोध केला होता त्याचा फायदा त्यांना झाला होता.बाधित शेतकऱ्यांच्या शेतीचा आणि त्यांच्या नुकसानीचा विचार करायला हवा.मी या लढ्यासोबत नक्कीच राहणार असून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे.

आपण देशातील सात राज्यांच्या भेटीवर आहे.तरीही आपण निवेदन तयार केले असून ते लगेच आपण पाठवून देऊ असे आश्वासन दिले आहे.आपल्याला लढा सनंदशील मार्गाने लढा लढवा असे शेवटी आवाहन केले आहे.

## जिल्ह्यात एक दिवसासाठी यलो अलर्ट जारी

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिनांक 27 मे 2026 रोजी दुपारी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. 27 मे 2026 या एक दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 40 ते 50 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका.

## तामसा उपबाजार समितीत शेतकऱ्यांवर अन्याय?

तामसा : (स. गांवकरी)

- हळद व्यापारात पारदर्शकतेचा अभाव
- व्यापारी-अधिकाऱ्यांच्या आर्थिक तडजोडींमुळे बाजार समितीच्या उत्पन्नावर प्रश्नचिन्ह




हदगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत येणाऱ्या तामसा उपबाजार समितीमध्ये गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या कारभारावर आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी उभारण्यात आलेल्या बाजार समितीत प्रत्यक्षात व्यापारी आणि काही अधिकाऱ्यांचे वर्चस्व वाढल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे.

काही वर्षांपूर्वी तामसा उपबाजार समितीतील गाळे वाटप प्रक्रियेत शेतकऱ्यांना प्राधान्य देण्याऐवजी व्यापारी आणि अधिकाऱ्यांच्या जवळच्या व्यक्तींना लाभ देण्यात आल्याचा आरोप स्थानिक स्तरावरून होत आहे. यामुळे बाजार समितीची मूळ उद्दिष्टे बाजूला पडून आर्थिक हितसंबंधांना अधिक महत्त्व दिले गेल्याचे बोलले जात आहे.

सध्या तामसा बाजारपेठेत दररोज जवळपास दहा हजार क्विंटल हळदीची आवक होत असूनही कृषी उत्पन्न बाजार समितीला अपेक्षित महसूल मिळत नसल्याची बाब समोर येत आहे. बाजार समितीने निश्चित केलेल्या कर आकारणीप्रमाणे वसुली होत नसल्यामुळे समितीच्या उत्पन्नाचा मेळ लागत नसल्याची चर्चा व्यापारी व शेतकरी वर्गात सुरू आहे.

विशेष म्हणजे, हळदीच्या खरेदी-विक्रीमध्ये पारदर्शक लिलाव पद्धतीचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना कवडीमोल भावात माल विकावा लागत असल्याची तक्रार शेतकरी व्यक्त करत आहेत. अधिकृत लिलाव प्रक्रिया राबविली जात नसल्यामुळे काही व्यापाऱ्यांकडून मनमानी दर ठरविले जात असल्याचे आरोप आहेत. परिणामी शेतकऱ्यांच्या मेहनतीला योग्य मोबदला मिळत नसून आर्थिक फटका बसत आहे.

बाजार समिती प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊन संपूर्ण व्यवहार पारदर्शक करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. तसेच गाळे वाटप, कर वसुली आणि हळद खरेदी प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. तामसा परिसरातील हळद उत्पादक शेतकऱ्यांचे अर्थकारण मोठ्या प्रमाणात या बाजारपेठेवर अवलंबून असल्याने संबंधित यंत्रणांनी तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पत्रकारांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध : आ. बाबुराव कदम

- हदगाव हिमायतनगर विधानसभा क्षेत्रात पत्रकार बांधवांचे जीवन सुरक्षा कवच म्हणून विमा काढण्यासाठी पुढाकार

तामसा : (स. गांवकरी)




हदगाव हिमायतनगर विधानसभा क्षेत्रात सर्व पत्रकार बांधवांच सुरक्षा कवच म्हणून जीवन विमा काढण्यासाठी कटिबद्ध असल्याची गवाही हदगाव हिमायतनगर तालुक्याचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी तामसा येथे आयोजित पत्रकारांच्या सत्कार व परिषद मेळाव्यात अध्यक्ष स्थानी उपस्थित असलेले आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी आयोजित कार्यक्रमात पत्रकाराच्या सुरक्षा संबंधी येणारे अडचणी, दिवंगत झालेले पत्रकारांच्या कुटुंबाला आर्थिक प्रोत्साहन, सरसेनापती नेताजी पालकर पुरस्कार दीपक सूर्यवंशी, शेख चांद पाशा, स. द. कल्याणे, रामेश्वर बोरकर तसेच द सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, दर्पणकार बाल शास्त्री जांभेकर पुरस्कार, डॉ. एपीजे अब्दुल कलाम गुणवंत विद्यार्थी पुरस्कार दहावी व बारावी, नवोदय, गुणवंत विद्यार्थी ज्येष्ठ पत्रकारांच्या संपत्नीक सत्कार आणि पत्रकारांच्या कौटुंबिक धोंडे जेवण चा कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विधानसभा क्षेत्राचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय राहुलवार यांनी केले तर आभार आयोजक बाळासाहेब खानजोडे यांनी मानले कार्यक्रमात हदगाव हिमायतनगर तालुक्यातील ज्येष्ठ,श्रेष्ठ, वर्तपत्र विक्रेता मोठ्या संख्येने उपस्थित होते. हदगाव हिमायतनगर विधानसभा क्षेत्रात सर्व पत्रकार बांधवांच जीवन बीमा काढण्यासाठी आमदार यांनी पुढाकार घेतला असून सर्व पत्रकार बांधवांनी विमा साठी लागणाऱ्या कागदपत्रे तयार करून आमदार यांच्या कार्यालयात जमा करण्याच आवाहन अंदर कोहळीकर यांनी केले येणारा सर्व खर्च आमदार स्वतः करणार अशी गहावी दिली. दिवंगत पत्रकार यांना आदरांजली वाहण्यात आली.

## कृषी निविष्ठा विक्रेत्यांची खरीप पूर्वतयारी आढावा बैठक संपन्न




नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांची खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा बैठक आज जिल्हा असोसिएशन हॉल, नवीन मोढा, नांदेड येथे संपन्न झाली. कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम २०२६ संदर्भात मार्गदर्शन व आवश्यक सूचना देण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून कृषी निविष्ठा विक्रेत्यांना मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल यांनी सोयाबीन बियाण्यांच्या उगवण तक्रारी टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी जागतिक आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपी खतांचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन आवश्यक नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. तसेच ‘अल-निनो’च्या पार्श्वभूमीवर उद्भवू शकणाऱ्या कृषी आपत्कालीन परिस्थितीबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

## ७०००+ यशस्वी न्यूरोसर्जरींचा अभूतपूर्व टप्पा; हजारो रुग्णांना नवजीवन

नाशिक : (स. गांवकरी)

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे प्रसिद्ध न्यूरोसर्जन आणि स्पाईन सर्जन डॉ. शेखर चिरमाडे यांनी त्यांच्या वैद्यकीय कारकिर्दीत ७००० हून अधिक यशस्वी न्यूरोसर्जरी पूर्ण केल्याबद्दल विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे न्यूरोसर्जरी क्षेत्रातील त्यांचे योगदान अधोरेखित झाले आहे. गेली २८ वर्षे डॉ. चिरमाडे न्यूरोसर्जरी क्षेत्रात कार्यरत असून, विविध नामांकित हॉस्पिटलमध्ये त्यांनी सेवा दिली आहे. त्यापैकी १७ वर्षे त्यांनी विविध हॉस्पिटलमध्ये स्वतंत्र प्रॅक्टिस केली असून, गेल्या ८ वर्षांपासून ते अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलशी संलग्न आहेत. विशेष म्हणजे, डॉ. चिरमाडे यांनी त्यांच्या एकूण ७०००+



न्यूरोसर्जरींपैकी २५०० हून अधिक न्यूरोसर्जरी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. तसेच, योग्य निदान, औषधोपचार, फिजिओथेरपी आणि वेळेवर उपचार यांच्या मदतीने अनेक रुग्णांना शस्त्रक्रियेविना यशस्वीरित्या बरे करण्यात आले आहे. या कालावधीत ब्रेन ट्यूमर, स्पाईनचे विकार, अपघातातील गंभीर दुखापती तसेच मेंदू व मणक्याशी संबंधित अनेक जटिल शस्त्रक्रिया यशस्वीरित्या हाताळण्यात आल्या आहेत. यावेळी बोलताना डॉ. शेखर चिरमाडे म्हणाले, “७००० हून अधिक न्यूरोसर्जरी पूर्ण करणे ही माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि जबाबदारीची गोष्ट आहे. प्रत्येक रुग्ण हा आमच्यासाठी एक नवीन अनुभव असतो. रुग्णांचा आमच्यावर असलेला विश्वास हेच आमचे सर्वात मोठे बळ आहे. योग्य निदान आणि वेळेवर उपचार यामुळे अनेक रुग्णांना शस्त्रक्रियेविनाही बरे करता येते.” ते पुढे म्हणाले, “अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आम्ही Minimally Invasive Spine Surgery (MIS Surgery) ची सुरुवात केली असून, त्यामुळे रुग्णांना कमी वेदना, कमी रक्तस्राव आणि जलद रिकव्हरीचा फायदा मिळत आहे. तसेच, ट्रॉमा आणि अपघातांमध्ये ‘Golden Hour’ अत्यंत महत्त्वाचा असतो. हॉस्पिटलमध्ये CT Scan, अत्याधुनिक ICU, Emergency Care आणि सर्व सुपरस्पेशालिटी तज्ज्ञ एकाच छताखाली उपलब्ध असल्यामुळे रुग्णांना तातडीने योग्य उपचार मिळतात.” या यशामध्ये भूलतज्ज्ञ, नर्सिंग स्टाफ, टेक्निशियन आणि संपूर्ण वैद्यकीय टीमचे मोलाचे योगदान असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. अखिलेश सोमानी, प्रमुख – आपत्कालीन वैद्यक विभाग (Head of Emergency Medicine Department), अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल हे देखील उपस्थित होते. त्यांनी यावेळी आपत्कालीन वैद्यक (Emergency Medicine) या शाखेबाबत थोडक्यात माहिती देत, गंभीर अपघात आणि ट्रॉमा केसेसमध्ये तातडीच्या उपचारांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, त्यांनी डॉ. शेखर चिरमाडे यांच्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक करत त्यांचे विशेष स्वागत केले. यावेळी बोलताना अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, “डॉ. शेखर चिरमाडे यांनी गाठलेला ७०००+ न्यूरोसर्जरींचा टप्पा हा अत्यंत अभिमानास्पद आहे. त्यापैकी २५०० हून अधिक यशस्वी न्यूरोसर्जरी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये पार पडल्या आहेत, ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर आणि तातडीच्या उपचार सुविधांमुळे अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलने न्यूरोसर्जरी क्षेत्रात विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे.” या कार्यक्रमात डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये मेंदू, मणका आणि न्यूरोलॉजिकल आजारांवरील अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध असून, रुग्णांना अचूक निदान आणि तज्ज्ञ उपचार देण्यासाठी हॉस्पिटल सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ओतूरच्या भ्रष्टाचारी ग्रामविकास अधिकाऱ्यावर कार्यवाही कधी होणार?

जुन्नर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील सर्वात मोठी महसूल असणारी ग्रामपंचायत म्हणजे ओतूर ग्रामपंचायत या ग्रामपंचायत मध्ये असलेले ग्रामविकास अधिकारी हे हमेशा याना त्या कारणामुळे चर्चेत राहिले. सराफआळी येथील निकृष्ट दर्जाच्या रस्ता तयार करून ग्रामपंचायतने भ्रष्टाचाराचा एक उत्कृष्ट नमुना गावकऱ्यांना दाखवला. या प्रकरणाची चौकशी विस्तार अधिकारी संजय जंजाळ यांनी करून संबंधित अधिकाऱ्यावर व संबंधित ठेकेदार कारवाई केली नाही. भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्या पत्रकार नयन डुंबरे यांना वेळोवेळी दमबाजी व धमकीला सामोरे जावे लागले. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यावर गटविकास अधिकारी यांच्याकडे पत्रकार नयन डुंबरे यांनी लेखी तक्रार करून देखील कारवाई करण्यात आली नाही. अशा भ्रष्ट ग्रामविकास अधिकाऱ्यावर मेहरबानी का केली जाते. हा अधिकारी कोणाच्या छत्र छायेखाली भ्रष्टाचार करून देखील पदावर कायम आहे. हे मात्र ओतूरकरांना न समजणारे कोडे आहे. या प्रकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पर्यंत आवाज उठवणाऱ्या सामान्य नागरिकांचा आवाज दाबण्याचा काम हे अधिकारी करत आहेत सदर प्रकरणात ग्रामविकास अधिकारी, विस्तार अधकारी,गट विकास अधिकारी यांच्यावर कारवाई झाली नाही तर राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना निवेदन देऊन येणाऱ्या काही दिवसात पत्रकार नयन डुंबरे हे ग्रामपंचायत कार्यालय ओतूर या ठिकाणी आमरण उपोषण करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तरी संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी व केलेला भ्रष्टाचार संबंधित अधिकाऱ्याकडून शासनाने वसूल करावाअशी मुख्य मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

### धरणग्रस्त शेतकऱ्यांना मिळालेल्या जमिनीतील शिवरस्ता खुला करा

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील मुकिंदपुर (काळेगांव) येथील जायकवाडी धरणग्रस्तांना मुकिंदपुर-भानसहिवरे शिवेलगत जमीनी मिळालेल्या आहेत.सदर शिवरस्त्यावर काही पूर्वीच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण करुन शिवरस्ता मोडला आहे. त्यामुळे धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमीनी मिळुनही शेतीमध्ये जाण्या-येण्यासाठी औजारे वाहीतीसाठी अनेक वर्षापासुन अडचण निर्माण झालेली आहे.धरणग्रस्त शेतकऱ्यांना मिळालेल्या जमिनीतील शिवरस्ता खुला करा अन्यथा अन्यथा धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासमवेत आंदोलन करू असा ईशारा धरणग्रस्त शेतकरी सखाराम साठे यांनी दिला आहे शासन दरबारी अर्ज, विनंत्या केलेल्या आहेत परंतु अद्यापपर्यंत रस्ता खुला झालेला नाही, भुमी अभिलेख खात्याकडे चौकशी केली असता शिवरस्ता साठी ६ महिने मुदत दिलेली आहे.तो पर्यंत शेतात पिके, वहिवाट कशी करायची शेती, पाणी असुन पिके उत्पन्न घेता येत नाही, शेजारील शेतकरी शेतात जाऊ देत नाही, धरणग्रस्त शेतकयांच्या कुटुंबाबर उपासमारीची वेळ आलेली आहे. तरी शासनाने आमचा रस्ता पावसाळयाच्या पूर्वी खुला व चालु करुन द्यावा अन्यथा धरणग्रस्त शेतकऱ्यांना बरोबर घेऊन कुटुंबासह उपोषण करणार असल्याचा ईशारा धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने सखाराम साठे यांनी दिला आहे.




### मेक इन इंडिया स्वप्न पडद्यावर उलगडणार

मुंबई (स. गांवकरी) : काही कथा कंपन्यांची निर्मिती करतात, काही वारसा घडवतात आणि काही शांतपणे राष्ट्रांना जगाच्या नकाशावर नेऊन ठेवतात. ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या भारतातील आघाडीच्या विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज त्यांच्या आगामी मालिकेच्या 'मेड इन इंडिया- अ टायटन स्टोरी' या भारताच्या सर्वात प्रतिष्ठित ग्राहक ब्रँडपैकी एकाच्या मागे असलेल्या विलक्षण प्रवासाने प्रेरित अशा आकर्षक कथानकाच्या ट्रेलरचे अनावरण केले. विनय कामत यांच्या "टायटन-इंडियाज मोस्ट सक्सेसफुल कन्झ्युमर ब्रँड" या प्रशंसित पुस्तकावर आधारित या मालिकेत जेआरडी टाटाच्या भूमिकेत नसिरुद्दीन शाह, झेरक्सेस देसाईच्या भूमिकेत जिम सर्भ, त्याशिवाय वैभव तत्ववादी, नमिता दुबे, लक्षवीर सरन आणि कावेरी सेठ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ही मालिका मेक इन इंडिया उपक्रमाच्या भावनेशी सुसंगत असून तिचा उद्देश भारताला जागतिक रचना आणि उत्पादन केंद्रामध्ये रूपांतरित करण्याचा आहे. करण व्यास लिखित, रॉबी ग्रेवाल दिग्दर्शित आणि अलमाइटी मोशन पिक्चर्स निर्मित, ही सहा भागांची मालिका महत्त्वाकांक्षा, मार्गदर्शन आणि उत्कृष्टतेचा अथक पाठपुरावा यांचा शोध घेते, ज्याने एका अशक्य कल्पनेचे रूपांतर राष्ट्रीय वारशात केले.

### फ्लिपकार्टतर्फे विद्यार्थ्यांसाठी 'बॅक टू कॅम्पस २०२६' विशेष विक्री उपक्रम

Flipkart

पुणे (स. गांवकरी) : फ्लिपकार्टने विद्यार्थ्यांसाठी 'बॅक टू कॅम्पस २०२६' विशेष विक्री उपक्रम जाहीर केला असून, २२ मे ते २८ मेदरम्यान विविध तंत्रज्ञान साधनांवर आकर्षक सवलती दिल्या जाणार आहेत. या उपक्रमात वहनक्षम संगणक, फलक संगणक, ध्वनी उपकरणे, बुद्धिमान घड्याळे आणि परिधान करता येणाऱ्या बुद्धिमान साधनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षण, सर्जनशीलता आणि दैनंदिन वापरासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम साधनांची मागणी वाढत असल्याने, ही साधने अधिक परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यावर कंपनीने भर दिला आहे.या विक्री उपक्रमात आसुस, सॅमसंग, लेनोव्हो, मोटोरोला, एचपी, डेल, एसर, ॲपल, वनप्लस, सोनी, जेबीएल, बोट, नॉईज आणि रिअलमी आदी नामांकित कंपन्यांच्या उत्पादनांवर सवलती देण्यात येत आहेत. ॲपल मॅकबुक एअर एम५, सॅमसंग गॅलेक्सी बुक ६, आसुस विवोबुक १४, लेनोव्हो लीजन प्रो ५, वनप्लस पॅड ४ आणि एसर आयकोनिया टॅब ५जी यांसारखी नव्या पिढीची उपकरणेही या उपक्रमात उपलब्ध आहेत. फ्लिपकार्टच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे उपाध्यक्ष सुजित अगाशे म्हणाले, "आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित युगात तंत्रज्ञान हे विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचे साधन बनले आहे.

# शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यासाठी ऐतिहासिक पाऊल

## म्हातारपिंपरी-मढेवडगाव नकाशावरील रस्त्याचे यशस्वी सीमांकन

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील म्हातारपिंपरी-मढेवडगाव येथील नकाशावरील शेतरस्त्याचे सीमांकन प्रशासन आणि शेतकरी यांच्या समन्वयातून यशस्वीरीत्या पार पडले. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे आणि भूमी उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशानुसार, तसेच कर्तव्यदक्ष पीएसआय किरण शिंदे यांच्या उपस्थितीत ही कारवाई शांततेत पूर्ण करण्यात आली.



शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी रस्त्याचे अचूक सीमांकन केले. त्यानंतर तलाठी वाबळे मॅडम, कोतवाल योगेश ठोकळे, कॉन्स्टेबल काटकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला सुरुवात करण्यात आली.

या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून शेतात जाण्यासाठी कायमस्वरूपी कायदेशीर मार्ग उपलब्ध होणार आहे. पावसाळ्यातील चिखल, अडथळे आणि वाहतुकीच्या समस्यांमध्ये घट होणार असून ट्रॅक्टर, हार्वेस्टर, औषध फवारणी यंत्रे तसेच शेतीमाल वाहतुकीस मोठी सुविधा मिळणार आहे. द्राक्ष, ऊस, भाजीपाला व इतर पिकांचा माल वेळेत बाजारपेठेत पोहोचण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांचा वेळ, श्रम आणि आर्थिक नुकसानही वाचणार आहे.

भविष्यातील पिढ्यांसाठी कायमस्वरूपी शेतरस्त्यांची व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे. प्रशासन आणि शेतकरी एकत्र आल्यास कोणतीही समस्या मार्गी लागू शकते, याचे हे आदर्श उदाहरण ठरले आहे.

यावेळी पीएसआय किरण शिंदे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,

"हे रस्ते शेतकऱ्यांच्या हितासाठी आहेत. प्रशासन आणि चळवळ समन्वय साधून ऐतिहासिक काम करत आहेत. या कामाला आमचे पूर्ण सहकार्य राहील. कोणीही अडथळा निर्माण करू नये." या ऐतिहासिक कारवाईवेळी दादासाहेब जंगले पाटील, अनिलभाऊ वाबळे, बाप्पुसाहेब हिरडे, तलाठी वाबळे मॅडम, शशिकांत वाबळे, माजी सरपंच सचिन ठोकळे, मिलिंद वाबळे, ऋषिकेश वाबळे, संजय हिरडे, दादासाहेब कापसे, कोतवाल योगेश ठोकळे, नितीन काळाने, संतोष काळाने, शैलेंद्र वाबळे, शरद वाबळे, सचिन वाबळे, संदीप वाबळे, मोहनराव तावरे, संभाजी ठोकळे, जमाल भाई पठाण, फकीर भाई पठाण, पोलीस पाटील हरिभाऊ हिरडे, मोहनराव मांडे, संजय शिरवाळे, बाळासाहेब गाडेकर, शुभम तावरे, नितीन वाबळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. शिव पाणंद शेत रस्ते चळवळीच्या वतीने महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग, पोलीस प्रशासन आणि सर्व शेतकरी बांधवांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## सौ. अमरीननुरी अब्दुल आहद यांचे जात प्रमाणपत्र भोवऱ्यात!

देगलूर : (स. गांवकरी)

देगलूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये प्रभाग क्र. ०२ (अ) मधून इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) विजयी झालेल्या उमेदवार सौ. अमरीननुरी अब्दुल आहद यांच्या जात प्रमाणपत्रावरून आता मोठा वाद निर्माण झाला आहे. त्यांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे 'छप्परबंद' जातीचे प्रमाणपत्र मिळवून शासनाची व निवडणूक आयोगाची फसवणूक केल्याचा खळबळजनक आरोप 'माहिती अधिकार संरक्षण समिती'चे जिल्हा उपाध्यक्ष तथा बिलोली नगरपरिषदेचे माजी नगरसेवक जावेद अ. गफुर कुरेशी यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी थेट जिल्हा जात पडताळणी समिती, राज्य निवडणूक आयोग आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे पुराव्यांसह लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, विजयी उमेदवार सौ. अमरीननुरी अब्दुल आहद यांचे माहेरकडील नाव 'कुरेशी अमरीन खुर्शीद' असे आहे. सर्वसाधारणपणे कुरेशी हे आडनाव असल्यास त्यांची जात कुरेशी, खाटीक किंवा कसाई असणे अपेक्षित असते. मात्र, त्यांनी उपविभागीय कार्यालय बिलोली येथून १९ ऑक्टोबर २०२५ रोजी 'छप्परबंद' (विमुक्त जाती-अ /(व्हीजे )या जातीचे प्रमाणपत्र मिळवले. आडनाव एक आणि जात भलतीच दाखवून त्यांनी मूळ जात लपविल्याचा संशय तक्रारदाराने व्यक्त केला आहे. 'छप्परबंद' ही जात विमुक्त जाती- 'व्हिजे - अ प्रवर्गात मोडत असल्याने, नियमन अधिनियम २००० नुसार २१ नोव्हेंबर १९६१ पूर्वीचा महसुली किंवा शालेय पुरावा सादर करणे बंधनकारक आहे. मात्र, हे प्रमाणपत्र काढताना असा कोणताही ठोस पुरावा जोडण्यात आला नाही, तसेच प्रशासनाकडून कोणतीही गृहचौकशी करण्यात आली नाही, असा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

## दुरावस्थेबाबत ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना भेटणार

**दादा पाटील सोनवणे**

राहुरी शहरातील अनेक विकासाची कामे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत चाळीस वर्षे नगर पालिकेची सत्ता ताब्यात असताना सत्ताधारी गटाला नागरिकांच्या आणी व्यापारी वर्गाच्या मुलभूत गरजा सोडविण्यात अपयश आले आहे डिसेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत मतदारांनी सताधारी गटाला परत सत्तेत बसवले नवी पेठ मधील गणपती मंदिर ते शनीमंदिरा पर्यंत असलेल्या दुकान गाळ्यात पावसाळ्यात पाणी जाऊन त्यांच्या मालाचे नुकसान गेली अनेक वर्षापासून होतं आहे तो मार्गी लावणे अत्यंत गरजेचे आहे आगामी काळात महायुती सरकारच्या माध्यमातून पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करणार असून लवकरच शहरातील भाजपा पदाधिकार्यांचे शिष्टमंडळ पालकमंत्र्यांना भेटणार असल्याचे दादा पाटील सोनवणे यांनी सांगितले.

राहुरी : (स. गांवकरी)

राहुरी शहराच्या रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुर्दशा झाली असून कुलकर्णी हॉस्पीटल ते शुक्लेश्वर चौक या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना रस्त्याने चालणे मुश्कील झाले आहे हा रस्ता व्हावा या साठी राहुरी नगर पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दादा पाटील सोनवणे यांनी विशेष प्रयत्न करुन स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून या रस्त्यासाठी निधी मंजूर केला होता परंतु स्थानिक काही लोकांनी या कामाला विरोध करुन काम होऊ नये यासाठी पालिका प्रशासनाला पत्र दिले. आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी शहरातील काही रस्त्याच्या कामासाठी विशेष निधी मंजूर केला होता या कामातील काही रस्त्यांची कामे झाली यात शुक्लेश्वर चौक ते कानिफनाथ चौक या रस्त्यांचे काम पूर्ण झाले कुलकर्णी हॉस्पीटल ते शुक्लेश्वर चौक या भागातील व्यापारी,ग्राहक, नागरिक यांच्या मागणीनुसार हा रस्ता व्हावा म्हणून राहुरी नगर पालिकेचे विरोधीपक्षनेते दादा पाटील सोनवणे यांनी आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या कडे विशेष प्रयत्न केले जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी या कामी लक्ष घालून व्यापारी वर्गाच्या दुष्टीने महत्वाचा असणाऱ्या या कामासाठी मोठा निधी मंजूर केला परंतु काही या भागातील काही लोकांनी या रस्त्याचे कामाला विरोध दर्शविला भुमिगत गटारीचे काम आता पूर्ण झाले आहे हा रस्ता होणे गरजेचे आहे आताचं नागरिकांना या रस्त्याने चालणे मुश्कील झाले आहे. पावसाळ्या पूर्वीच हा रस्ता होणे गरजेचे असून विरोधासाठी विरोध न करता हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे राहुरी शहरातील सर्वच अंतर्गत रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली आहे अपूर्ण कामे मार्गी लावण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील, आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून प्रयत्नशील राहणार असल्याचे दादा पाटील सोनवणे यांनी सांगितले

शहराच्या विकासासाठी भविष्यात महायुती सरकारच्या माध्यमातून जास्तीत जास्त विकास निधी आणून स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी शहराच्या विकासाचे पाहीलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी युवा आमदार अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली शहरातील भाजपाचे आजी माजी नगरसेवक प्रयत्नशील असल्याचे सोनवणे यांनी सांगितले.

## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक

■ सलोख्याने सण साजरा करण्याचे आवाहन

पारनेर : (स. गांवकरी)



देशभरात गुरुवारी (दि. २८) मुस्लिम बांधवांचा पवित्र 'बकरी ईद' (ईद-उल-अझा) हा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणात साजरा केला जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि सर्वधर्मीय बांधवांमध्ये सामाजिक सलोखा टिकून राहावा, यासाठी पारनेर पोलीस प्रशासनाच्या वतीने पारनेर पोलीस ठाण्यात शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. पारनेर तालुक्याची नेहमीच सामाजिक आणि धार्मिक एकतेची मोठी परंपरा राहिली आहे. यंदाही पारनेर शहर, टाकळी ढोकेश्वर, निघोज, सुपा, दरोडी, पिंपळगाव रोठा या प्रमुख गावांसह तालुक्यातील इतर छोट्या-मोठ्या गावांमध्ये मुस्लिम बांधव हा सण साजरा करणार आहेत. या सणादरम्यान कुठेही गालबोट लागू नये आणि शांततेत उत्सव पार पाडला जावा, या हेतूने सर्व धर्मीय नागरिक आणि प्रमुख नेत्यांची उपस्थिती या बैठकीत लक्षणीय होती.यावेळी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सर्व मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या आगाऊ शुभेच्छा दिल्या. तसेच, सर्व नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता, प्रशासनाला सहकार्य करावे आणि नेहमीप्रमाणे हा सणही सर्वधर्मसमभावाची भावना ठेवून साजरा करावा, असे आवाहन केले.या शांतता कमिटीच्या बैठकीला तालुक्यातील प्रमुख राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. यामध्ये युवा नेते अर्जुनशेठ भालेकर,पारनेर नगरपंचायतचे नगरसेवक योगेश मते, डॉ. बाळासाहेब कावरे, नगरसेवक भूषण शेलार, राजुशेठ शेख, डॉ. सादिक राजे, ॲड.तुषार औटी,राजु उबाळे,मच्छिंद्र नगरे आदींसह मुस्लिम बांधव यांचा प्रामुख्याने समावेश होता. या नेत्यांनीही आपल्या मनोगतातून पारनेरमधील सर्वधर्मीय एकतेचा पुनरुच्चार केला.बैठकीला पारनेर तालुक्यातील मुस्लिम बांधव आणि विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनीच पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आणि शांततेत व उत्साहात सण साजरा करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीमुळे तालुक्यातील सलोख्याचे वातावरण अधिक दृढ होण्यास मदत झाली आहे.

## अमेझॉनतर्फे फायर टीव्ही स्टिक एचडी लॉन्च

पुणे : (स. गांवकरी)




अमेझॉनने भारतीय बाजारपेठेत नवी 'फायर टीव्ही स्टिक एचडी' सादर करत घरगुती मनोरंजन क्षेत्रातील स्पर्धा अधिक तीव्र केली आहे. आधीच्या पिढीच्या तुलनेत ही नवी साधनसामग्री सरासरी ३० टक्के अधिक वेगाने कार्य करत असल्याचा दावा कंपनीने केला असून ग्राहकांना अधिक जलद, अखंड आणि सुलभ चित्रप्रवाहाचा अनुभव देण्यावर भर देण्यात आला आहे. पूर्ण एचडी दर्जातील चित्रप्रवाह, अधिक स्थिर बिनतारी जाळे जोडणी, वेगवान प्रतिसाद क्षमता आणि नव्या स्वरूपातील वापर प्रणाली ही या उत्पादनाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जात आहेत. कंपनीच्या मते, ही आतापर्यंतची सर्वात सडपातळ आणि हलकी 'फायर टीव्ही स्टिक' असून ती थेट दूरचित्रवाणी संचाच्या 'यूएसबी' जोडणीद्वारे चालवता येते. त्यामुळे स्वतंत्र विद्युत जोडणी किंवा अतिरिक्त तारा वापरण्याची गरज राहत नाही. आकाराने लहान असल्याने ती प्रवासादरम्यान सहज बरोबर नेता येणार असून ग्राहकांना कुठेही त्यांच्या आवडत्या मालिका, चित्रपट किंवा थेट कार्यक्रमांचा आनंद घेता येणार आहे. नव्या प्रणालीमध्ये चित्रपट, मालिका, थेट कार्यक्रम आणि विनामूल्य सामग्रीसाठी स्वतंत्र विभाग देण्यात आले आहेत. त्यामुळे ग्राहकांना हवे असलेले मनोरंजन कमी वेळेत शोधणे शक्य होणार आहे. याशिवाय, घरातील वातानुकूलन यंत्रणा, पंखे, दिवे आणि इतर स्मार्ट उपकरणांचे नियंत्रणही या प्रणालीद्वारे करता येणार आहे.

# शवविच्छेदनासाठी पैशांची मागणी

## पारनेरच्या ग्रामीण रुग्णालयात राष्ट्रवादी काँग्रेसचे ठिय्या आंदोलन

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी मृतांच्या नातेवाईकांकडून पैशांची मागणी होत असल्याच्या गंभीर आरोपांप्रकरणी बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस व विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. मंगळवारी पारनेर शहरातील एका तरुणाने आत्महत्या केल्यानंतर त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला होता. मात्र शवविच्छेदनासाठी टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आरोप करत संतप्त तरुणांनी रुग्णालय प्रशासनाविरोधात ठिय्या आंदोलन छेडले. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या वेळी शवविच्छेदन करता येणार नसल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर पोलिस प्रशासनाचे पत्र आवश्यक असल्याचे, संबंधित कर्मचारी उपलब्ध नसल्याचे तसेच शवविच्छेदनासाठी आवश्यक मेडिकल किट नसल्याची कारणे पुढे करण्यात आली. अखेर कर्मचारी बोलावण्यासाठी वाहनखर्च व इतर रकमेची मागणी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. मेडिकल किटच्या नावाखालीही पाच हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याने उपस्थित तरुणांमध्ये संतापाची लाट उसळली. राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. बाळासाहेब कावरे यांनी या प्रकारामागे ग्रामीण रुग्णालयातील कथित रॅकेट कार्यरत असल्याचा गंभीर आरोप केला. मृतांच्या नातेवाईकांच्या दुःखाचा गैरफायदा घेत आर्थिक लूट सुरू आहे. या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलनादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, नगरसेवक योगेश मते, डॉ. सचिन औटी, भूषण शेलार, सुभाष शिंदे, राजू शेख, विजय भास्कर औटी, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष वैभव औटी, विजय डोळ, राजेंद्र शेरकर, सतीश म्हस्के, राहुल बुगे, अक्षय औटी, किरण चौधरी, उत्कर्ष ठोकळ, अनिकेत साबळे, ऋतिक गायकवाड, शुभम जगताप, योगेश व्यवहारे, गणेश गजभिव, राहुल चौरे, शशीकांत औटी, जुनेद राजे, गौरव श्रीमंदीलकर आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनाची माहिती मिळताच खासदार नीलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांनी ग्रामीण रुग्णालयात भेट देत आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दिला. मृतांच्या नातेवाईकांवर अशा प्रकारे आर्थिक अन्याय होणे अत्यंत संतापजनक आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.



डॉ. लोंढे यांच्या भूमिकेचा निषेध करत आंदोलनकर्त्यांनी त्यांच्या खुर्चीला पुष्पहार अर्पण करून गांधीगिरी आंदोलन केले. प्रशासनाने चौकशीचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असले, तरी दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतिश लोंढे यांनी स्वतः रुग्णालयात येऊन आंदोलकांशी चर्चा करावी, अशी मागणी केली होती. मात्र डॉ. लोंढे यांनी फोनवरून चर्चा करत संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक असल्याने आपण पारनेरला येऊ शकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

# नाशिककरांना मोठा दिलासा ! द्वारका ते नाशिकरोड सहापदरीकरणास मंजुरी

## खासदार राजाभाऊ वाजे यांच्या पाठपुराव्याला यश, नितीन गडकरींचे नाशिकरांना रिटर्न गिफ्ट

नाशिक : (स. गांवकरी)

- तात्पुरता सहापदरी झाला तरी उड्डाणपुलाची मागणी कायमच, खासदार राजाभाऊ वाजे यांचा निर्धार कायम



आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अखेर महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, केंद्र सरकारने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० वरील द्वारका ते नाशिकरोड या अत्यंत वर्दळीच्या मार्गाच्या सहापदरीकरणाला मंजुरी दिली आहे. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रकल्पाला हिरवा कंदील दिल्यानंतर नाशिककरांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामागे राजाभाऊ वाजे यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरल्याचे बोलले जात आहे.

द्वारका ते नाशिकरोड हा मार्ग शहरातील सर्वाधिक वाहतूक असलेल्या प्रमुख रस्त्यांपैकी एक मानला जातो. दररोज हजारो वाहनांची या मार्गावरून ये-जा होत असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. विशेषतः सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत या परिसरातील वाहतूक व्यवस्था अक्षरशः कोलमडून पडत असल्याची परिस्थिती होती. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात लाखो भाविक नाशिकमध्ये दाखल होणार असल्याने ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

याच पार्श्वभूमीवर खासदार राजाभाऊ वाजे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. शहराच्या दीर्घकालीन वाहतूक नियोजनासाठी या मार्गावर अखंड उड्डाणपूल तसेच मेट्रो प्रकल्पाची आवश्यकता असल्याचे त्यांनी वारंवार केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. द्वारका ते दत्त मंदिर चौक या मार्गावरील उड्डाणपूल हा भविष्यातील कायमस्वरूपी उपाय असल्याचा आग्रहही त्यांनी कायम ठेवला होता.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने या संदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला होता. मात्र, संबंधित प्रकल्पाचा खर्च अत्यंत मोठा असून तो दीर्घकालीन स्वरूपाचा असल्याचे मत केंद्र शासनाने नोंदविले. सचिव स्तरावरील बैठकीत तातडीने उड्डाणपूल व मेट्रोसारख्या मोठ्या प्रकल्पांना मंजुरी देणे वेळेअभावी शक्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. तथापि, कुंभमेळ्यापूर्वी नाशिककरांना तातडीचा दिलासा मिळावा, यासाठी खासदार वाजे यांनी प्रयत्न सुरूच ठेवले. अखेर त्यांच्या आग्रहाला यश मिळाले असून, तत्पुरत्या उपाययोजनेच्या स्वरूपात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० चे सहापदरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सर्विस रोड उभारण्यात येणार असून, त्यामुळे द्वारका ते दत्त मंदिर हा संपूर्ण मार्ग प्रत्यक्षात आठ पदरी होणार आहे. या कामासाठी तब्बल २२१.५२ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी स्वतः यासंदर्भात 'एक्स' या समाजमाध्यमावर माहिती देत प्रकल्पाला मंजुरी मिळाल्याचे जाहीर केले. या निर्णयामुळे नाशिक शहरातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वाची भर पडणार असल्याचे मानले जात आहे.

> नाशिक शहरातील वाढती वाहतूक आणि आगामी कुंभमेळा लक्षात घेता या रस्त्यावरील कोंडी सोडविणे अत्यंत आवश्यक होते. माझी प्राथमिक मागणी अखंड उड्डाणपुलाची होती आणि आजही ती कायम आहे. मात्र वेळेची मर्यादा लक्षात घेऊन किमान रस्त्याची रुंदी वाढविण्याचा पर्याय पुढे रेटला. त्यास केंद्र सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला, याबद्दल मंत्री नितीन गडकरी यांचे आभार,"
> **- राजाभाऊ वाजे, खासदार, नाशिक**

या प्रकल्पाला मंजुरी दिल्याबद्दल आभार मानतानाचे खासदार राजाभाऊ वाजे म्हणाले की, मेट्रो प्रकल्प आणि अखंड उड्डाणपूल हेच नाशिकच्या भविष्यातील वाहतूक समस्येवर कायमस्वरूपी उत्तर असल्याचे सांगत, त्या दृष्टीने केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नाशिकरोड ते द्वारका अखंड उड्डाणपूल व्हावा यासाठी कुंभमेळ्यानंतर त्वरित मंजुरी मिळावी यासाठी आतापासूनच पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचा निर्धार वाजे यांनी केलाय.

# थोडक्यात पण महत्वाचे



## नालेसफाईची कामे युध्दपातळीवर पूर्ण करावीत - सौरभ राव, आयुक्त

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे पूर्ण करत असताना कामाचा दर्जा, कामाची गती आणि वेळेत कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा, नालेसफाईची उर्वरित कामे 5 जूनपर्यंत युध्दपातळीवर पूर्ण होतील या दृष्टीने नियोजन करुन आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ, यंत्रसामुग्री उपलब्ध करण्याचे निर्देश आज झालेल्या बैठकीत आयुक्त सौरभ राव यांनी दिले. नालेसफाईच्या कामाचा प्रभाग समिती निहाय आढावा आयुक्तांनी घेतला. या बैठकीस उपायुक्त मधुकर बोडके, दीपक झिंजाड, डॉ. मिताली संचेती, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सर्व प्रभागसमितीचे सहायक आयुक्त व कार्यकारी अभियंता उपस्थित होते. ज्या ठिकाणी काम करताना अडचणी निर्माण होत असतील तर त्या ठिकाणच्या स्थानिक लोकप्रतिनिधींशी संपर्क ठेवावा, त्यांच्याकडून नालेसफाईबाबत ज्या सूचना येतील त्याची अंमलबजावणी करावी अशा सूचना सर्व सहायक आयुक्तांना दिल्या. तसेच ज्या ज्या ठिकाणी सखल भाग आहेत, जेथे दरवर्षी पाणी साचते, अशा ठिकाणी जवळपास 102 पंप बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, अतिवृष्टीच्या काळात सखल भागात पाणी साचल्यास त्या ठिकाणी पंप ऑपरेटरची व्यवस्था करणे तसेच पंप बंद पडल्यास तात्काळ कार्यवाही होईल याबाबत नियोजन करावे, शहरातील संवेदनशील आणि पूरप्रवण ठिकाणी विशेष लक्ष ठेवून उपाययोजना राबविण्याच्या सूचना आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिल्या. नालेसफाईदरम्यान काढण्यात येणारा गाळ तातडीने उचलून त्याची विल्हेवाट लावण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच रेल्वे हद्दीलगत असलेल्या कल्व्हर्ट, नाले, खाडीमुख आउटलेट्सची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात तसेच ज्या ठिकाणी मनुष्यबळाची कमतरता भासत असेल त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

## शेतीसाठी नदीपात्राद्वारे पाणी सोडण्याची मागणी : संचालक

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात शेती व दुध प्रमुख व्यवसाय आहे . चालु वर्षी पाण्यामुळे शेतकरी अडचणीत आलेला आहे . येणाऱ्या काळात पावसाची अजुनही अनिश्चिता आहे. यासाठी माणिकडोह धरणा मधुन शेतीसाठी नदीपात्राद्वारे पाणी सोडण्याची मागणी निवेदन कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक संतोष चव्हाण यांनी कुकडी पाटबंधारे विभागातील अधिकारी नन्नोर यांना दिले आहे. शेतकऱ्यांसाठी वडज धरणामधुन मिना नदीला आर्वीच्या पेशवेकालीन बंधाऱ्यापर्यंत व माणिकडोह धरणामधुन कुकडी नदीला गोळेगाव, कुमशेत, आगर, शिरोली व तेजेवाडीपर्यंत सर्व केटी भरण्याकरिता लवकरात लवकर पाणी सोडावे अशी मागणी कृ. उ. बा. स. संचालक व शेतकरी नेते संतोष चव्हाण यांनी पाटबंधारे विभागाकडे केली आहे . या मागणीची दखल घेऊन व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील २ दिवसात मिना नदी व कुकडी नदी पात्रात पाणी सोडण्यात येईल असे आश्वासन कुकडी पाटबंधारे विभाग अधिकारी नन्नोर यांनी दिले आहे. कुकडी प्रकल्पातील अधिकारी नन्नोर यांनी सर्व शेतकरी बांधवांना विनंती केली केले की , प्रत्येक केटीचे २ ढापे कमी करणे गरजेचे आहे. कमी पाण्यात सर्व केटी भरले जातील व पाऊस लांबल्यास आपल्याला अजुन एक पाण्याचे रोटेशन घेता येईल. माणिकडोह , वडज व पिंपळगाव जोगे धरण क्षेत्रातील फळबागा व इतर पिके अक्षरशः जळाली आहे. सर्व शेतकऱ्यांनी कुकडी पाटबंधारे विभागातील शिंदे व वाणखेडे यांना सहकार्य करा असे आवाहन करण्यात आले.

## एसटी चालक यांनी नियमाचे उल्लंघन व निष्काळजीपणामुळे अपघात

शिवनेरी (स. गांवकरी) : डिंगोरे येथील कल्याण नगर हायवे रोड जीवनदीप हॉटेल समोर एसटी चालक यांनी नियमाचे उल्लंघन व निष्काळजीपणामुळे मोटर सायकला धडक दिल्यामुळे चौघा जणांचा मृत्यू झाला. अशी फिर्याद ओतुर पोलीस स्टेशन येथे विठ्ठल यशवंत भले रा. डिंगोर यांनी दिली आहे . याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , एस.टी बस क्रमांक एम एच २० बी. एल. २९८३ यावरील चालक विठ्ठल यशवंत भले वय वर्ष ३५ रा . पुंडलिक महाराज गोरेगाव , तालुका मूर्तिजापुर ,जिल्हा अकोला. याच्या ताब्यातील एस टी बस हयगईने चालवीत डिंगोरे जीवनदीप हॉटेल जवळ कल्याण नगर हायवे रोडवर एसटी बस चालक आविचाराने , निष्काळजीपणे , रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करून चालवून हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकलला नंबर एम. एच १४ एम ए ७८४९ जोराची धडक दिली . या अपघातात आशिष ढवळू भले वय २४ वर्षे , दीपक सखाराम भले वय २८ वर्षे , खंडू नारायण भले वय २५ वर्षे व शिवराम नारायण पारधी वय २६ वर्षे सर्व रा. डिंगोरे यांना गंभीर दुखापत झाली . या चौघांना औषध उपचारापूर्वीच मृत्यू पावले . या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले . या घटनास्थळी डी वाय एस पी धनंजय पाटील , स पो नि ज्ञानेश्वर बाजगीरे व पो स ई युवराज जाधव यांनी तात्काळ भेट दिली. एस.टी बस चालक नागेश बबन गुरव यांना अटक करून गु. र. नं १४३, २०२६ बी एन एस २०२३ चे कलम २८१ , १२५ ( ऐ ), १२५ ( बी ), १०६ (१ ), मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे पुन्हा नोंद करण्यात आला आहे .या घटनेचा तपास स पो नि ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे .

# जागतिक पर्यावरण दिन प्रत्येक गावात साजरा व्हावा

अकोले : (स. गांवकरी)

पर्यावरणाचा समतोल ढासळत असताना आणि जागतिक तापमानवाढीचे गंभीर परिणाम सर्वसामान्य नागरिकांना जाणवू लागले असताना, पर्यावरण संरक्षणाची चळवळ अधिक व्यापक होण्याची आवश्यकता आहे. यासाठी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन प्रत्येक गावात, प्रत्येक शाळेत, प्रत्येक संस्थेत आणि प्रत्येक कुटुंबात साजरा व्हावा, असे आवाहन पर्यावरण प्रेमी परिवाराचे संस्थापक राहुल राऊत यांनी केले आहे. राऊत यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, आज निसर्गावर मानवनिर्मित संकटे वाढत असून त्याचे दुष्परिणाम थेट समाजाला भोगावे लागत आहेत. वाढते तापमान, कमी होत चाललेला पाऊस, आटत चाललेले जलस्रोत, नष्ट होत असलेली जैवविविधता आणि प्रदूषणामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून न राहता प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. पर्यावरण दिन हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून निसर्गाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखण्याचा दिवस आहे. प्रत्येक गावाने या दिवशी वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, स्वच्छता अभियान, जलसंवर्धन, प्लास्टिकमुक्ती, पक्षी व प्राण्यांसाठी पाणवठे निर्माण करणे तसेच पर्यावरण विषयक जनजागृतीचे उपक्रम राबवावेत. अशा उपक्रमांमधून समाजामध्ये पर्यावरणाबाबत सकारात्मक बदल घडू शकतो, असे त्यांनी नमूद केले. गेल्या काही वर्षांपासून पर्यावरण प्रेमी परिवाराच्या माध्यमातून विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# शेतकऱ्यांचे भुजबळ फार्मवर 'दाद मागो आंदोलन'

नाशिक : (स. गांवकरी)

- जिल्ह्यातील चारही मंत्र्यांनी शेतकरी हिताचा अंतिम निर्णय घ्यावा – शेतकरी शिष्टमंडळाची मागणी"



तालुक्यातील रिंग रोड बाधित शेतकऱ्यांनी आपल्या न्याय हक्काच्या मागण्यांसाठी मा.नामदार छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या "भुजबळ फार्म" या निवासस्थानी मोठ्या संख्येने उपस्थित राहत "दाद मागो आंदोलन" केले.शेतकरी आपल्या सहकुटुंब व सहपरिवारासह आंदोलनात सहभागी झाले होते.

दरम्यान,कांदा प्रश्नासंदर्भातील महत्त्वपूर्ण बैठकीसाठी नामदार छगन भुजबळ साहेब यांना तातडीने दिल्ली येथे जावे लागल्याने ते प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र,त्यांच्या स्वीय सहाय्यकांसोबत शेतकरी शिष्टमंडळाची सविस्तर चर्चा पार पडली. शिष्टमंडळाने नाशिक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या सकारात्मक बैठकीतील सर्व आश्वासनांची पूर्तता शासनाच्या संबंधित विभागांनी करावी,अशी ठाम मागणी केली.तसेच रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नामदार छगन भुजबळ साहेब यांनी स्वतः पुढाकार घेत नाशिक जिल्हाधिकारी व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याचे स्पष्ट आश्वासन द्यावे,अशी मागणीही यावेळी करण्यात आली. नाशिक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तयार होणाऱ्या पर्यायांवर अंतिम निर्णय मंत्रीमहोदय स्तरावर घेतला जाणार असल्याने नामदार गिरीश भाऊ महाजन,नामदार छगन भुजबळ,नामदार दादा भुसे आणि नामदार नरहरी झिरवाळ या नाशिक जिल्ह्यातील चारही वरिष्ठ मंत्र्यांनी एकत्रितपणे शेतकरी हिताचा निर्णय घ्यावा,यासाठी आम्ही सर्व मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.त्याच अनुषंगाने आजची भेट आयोजित करण्यात आली होती. रिंग रोडच्या भूसंपादनामध्ये कोणताही शेतकरी भूमिहीन होऊ नये,कोणाची घरे,विहिरी,गोठे व शेती उद्ध्वस्त होणार नाही याची काळजी घेत सकारात्मक निर्णय घ्यावा,अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच डीपी व आरपी रोडच्या धर्तीवर रस्त्याची अलाइनमेंट निश्चित करत शेतकऱ्यांचे कमीत कमी नुकसान होईल,अशा पद्धतीने नियोजन करावे,तोपर्यंत कुठलीही जमीन अधिग्रहित करू नये नोटीसा पाठवू नये जमीन खरेदी करू नये अशी ठाम भूमिका शेतकरी प्रतिनिधींनी मांडली. जर शासनाने आमच्याशी दगा फटका केला तर मात्र शेतकरी यापेक्षा अधिक तीव्र रस्त्यावरचा आंदोलन उभे करेल त्यामुळे संयमाची भूमिका घेत शासनानेच आता न्यायाच्या भूमिकेत यावे असा इशाराही या वेळी देण्यात आला.

यावेळी या आंदोलनात छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर शिवा तेलंग नवनाथ शिंदे आशिष हिरे सुभाष गायकर प्रवीण पाटील योगेश गांगुर्डे भारत पिंगळे दादासाहेब जोगदंड ज्ञानेश्वर पालखेडे यांसह 25 गावातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेसचा 'दोरखंड' एल्गार ; वाहने ओढत केंद्रावर हल्लाबोल!


ठाणे: (स. गांवकरी)




पेट्रोल डिझेल, गॅस आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या दरांविरोधात ठाणे शहर काँग्रेसने बुधवारी आक्रमक दोरखंड आंदोलन करत केंद्र सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला. महागाईच्या जोखडात जनता अडकली आहे असा संदेश देत शहरातील तीन पेट्रोल पंपांवरून काँग्रेस कार्यकर्त्यांनी वाहनांना दोरखंड बांधून मोर्चा काढला. आंदोलनादरम्यान केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यामुळे काही काळ परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. या आंदोलनाचे नेतृत्व ठाणे शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष राहुल पिंगळे यांनी केले. शरीराला दोरखंड बांधून वाहन हाकत त्यांनी केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांविरोधात अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. इंधन दरवाढ कमी करा... महागाई रोखा... सामान्यांना दिलासा द्या... अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. काँग्रेस कार्यकर्त्यांनी हातात फलक घेऊन केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात संताप व्यक्त केला. वाढत्या इंधन दरांचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. पेट्रोल-डिझेल दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढला असून त्याचा परिणाम भाजीपाला, अन्नधान्य, दूध, गॅस तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होत असल्याचे त्यांनी सांगितले. सामान्य नागरिकांचे महिन्याचे बजेट कोलमडले असून केंद्र सरकारने इंधनावरील करवाढ तातडीने कमी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनात महिला अध्यक्ष स्मिता वैती,सेवादल अध्यक्ष रवी कोळी,प्रदेश सदस्य निशिकांत कोळी,भालचंद्र महाडिक,महेंद्र म्हात्रे,शिरीष घरत,प्रसाद पाटील,कामगार नेते मोहन तिवारी, रवींद्र आंग्रे,दयानंद इंगडे ब्लॉक अध्यक्ष आनंद सांगळे,निलेश अहिरे,निलेश पाटील,अब्बास भाई,जावेद शेख,सुरेश भोईर,तरुण सिंग संगीता कोटल,प्रदेश ओबीसी उपाध्यक्ष सुरेश खेडे पाटील,राकेश पुर्णेकर,पांडुरंग शेवाळे,उमेश कांबळे, बाबू यादव,मनोज दुबे,मनोज डाकवे,राजेश मिश्रा,पप्पू मोमिन ,चंद्रकांत पाटील, नुर्शिद शेख गोपाळ सावंत,सागर लबडे,मेहर चौपाने,लोकेश घोलप, मीनाक्षी थोरात,अरुण राजगुरू,शीला गुप्ता, सर्व स्तरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यात ठाकरे गटाला मोठं खिंडार; सामूहिक राजीनामा

ठाणे : (स. गांवकरी)




ठाणे महानगर पालिका हद्दीतील दिवा शहरातील ठाकरे गटाला मोठा धक्का बसला असून अनेक महिला व पुरुष पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी आपल्या पदांचा सामूहिक राजीनामा दिला आहे. याबाबत आपला सामूहिक राजीनामा गुरुनाथ खोत (कल्याण लोकसभा संपर्क प्रमुख), मृणालताई यदनेश्वर (महिला कल्याण लोकसभा संघटिका), अभिजित सावंत (जिल्हाप्रमुख-कल्याण लोकसभा), संतोष जाधव (कल्याण लोकसभा सह-संपर्कप्रमुख) तसेच वैशालीताई दरेकर (जिल्हा संघटिका-कल्याण लोकसभा) यांना पाठवला आहे. दिव्यातील जुन्या शिवसैनिकांना डावलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे नाराज झालेल्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे राजीनामा पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसेच हिंदुत्वाच्या विचारांशी बांधिलकी कायम ठेवत शिवसैनिक म्हणून कार्य सुरू राहील अशी भूमिकाही पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. राजीनामा देणाऱ्यांमध्ये विधानसभा संघटक, विभाग प्रमुख, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, महिला आघाडीच्या विविध पदाधिकाऱ्यांसह ५० हून अधिक कार्यकर्त्यांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. या घडामोडीमुळे दिवा परिसरातील ठाकरे गटाच्या संघटनात्मक ताकदीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्र राज्य अपंग संघटनेचा बदली हक्कासाठी बुलंद आवाज

## सोईच्या ठिकाणी बदलीसाठी प्रशासन सकारात्मक : अप्पर आयुक्त दिनकर पावरा

नाशिक : (स. गांवकरी)



महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेच्यावतीने आदिवासी विकास भवन, नाशिक येथे अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांची भेट घेऊन सन २०२६ च्या सार्वत्रिक बदली प्रक्रियेमध्ये दिव्यांग कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ तसेच बदली अधिनियम २०२५ तसेच शासन निर्णयनुसार संरक्षणात्मक तरतुदींचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांनी सविस्तर चर्चा करत अपंग कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रियेमध्ये संवेदनशीलता, मानवतावादी दृष्टिकोन व न्याय्य प्रशासनाची गरज अधोरेखित केली.

सदर निवेदनामध्ये अपंग कर्मचारी / अधिकारी यांना सोयीच्या ठिकाणी बदली देण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली. तसेच बदली पात्र कर्मचाऱ्यांच्या यादीमध्ये "दिव्यांग प्रवर्ग" असा स्वतंत्र उल्लेख करून पारदर्शक व संवेदनशील प्रशासन राबविण्याची मागणी संघटनेने केली. यावेळी केंद्र शासनाच्या डीओपीटी २०२४च्या मेमोरेन्डमसह दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६मधील विविध तरतुदींचा संदर्भ देत सविस्तर चर्चा करण्यात आली. दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करताना प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी भूमिका संघटनेने मांडली. यावेळी अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांनी संघटनेच्या निवेदनाची दखल घेत दिव्यांग कर्मचाऱ्यांची बदली करताना त्यांची गैरसोय होणार नाही, याबाबत आवश्यक ती संवेदनशीलता ठेवली जाईल, असे आश्वासन दिले. तसेच संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली.

या प्रसंगी प्रभारी उपायुक्त निलेश अहिरे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी स्वप्निल साबळे, महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे राज्य सहसचिव सोमा भालनोर, राज्य प्रसिद्धीप्रमुख प्रदीप महाले, राज्य संचालक मनोहर नेटावटे यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

> दिव्यांग कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या अडचणी संवेदनशीलतेने समजून घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. बदली प्रक्रियेमध्ये शासन नियम व कायदेशीर तरतुदींचे पालन करून न्याय्य निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल. दिव्यांग कर्मचाऱ्यांची अनावश्यक गैरसोय होणार नाही, याची काळजी प्रशासन निश्चित घेईल.
> **- दिनकर पावरा, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास भवन, नाशिक विभाग**

> दिव्यांग कर्मचारी हे शासन व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण भाग आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ तसेच शासन निर्णयानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांची बदली करताना विशेष संवेदनशीलता ठेवणे आवश्यक आहे. दिव्यांग कर्मचाऱ्यांची बदली गैरसोयीच्या, दूरस्थ किंवा प्रतिकूल ठिकाणी होता कामा नये. त्यांच्या शारीरिक क्षमता, आरोग्य, प्रवास व कौटुंबिक परिस्थितीचा विचार करून सोयीच्या व राहत्या ठिकाणाजवळ बदली झाली पाहिजे.
> **:-बाळासाहेब सोनवणे सर, राज्य अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना**

## थोडक्यात पण महत्वाचे



## एकनाथ भाऊ बांडे राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

अकोले (स. गांवकरी) : साम्रद गावचे सरपंच एकनाथ भाऊ बांडे यांना नुकतेच राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्ञानज्योति बहुउद्देशीय संस्था,टाकळी भान या संस्थेच्या वतीने दरवर्षी समाजासाठी व गावासाठी महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असते.या वर्षी अकोले तालुक्यातील आदिवासी,दुर्गम भागातील साम्रद गावचे सरपंच एकनाथ भाऊ बांडे यांना या संस्थेने त्यांच्या स्वच्छतेकडून समृद्धी कडे नेणाऱ्या व वाखाखन्याऱ्या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एकनाथ बांडे यांनी गावातील सर्व नागरिकांना विश्वासात घेऊन,त्यांच्या चांगल्या कल्पनांचा स्वीकार करून त्या गावात राबविण्याचे कार्य केले. गावासाठी अनेक योजना राबवून स्वच्छतेकडून समृध्दीकडे नेणारा त्यांचा प्रवास आदर्श असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत असते.साम्रद या गावात सांदण दरी हे पर्यटकांना आकर्षित करणारे पर्यटन क्षेत्र असल्याने या ठिकाणी राज्यातून येणाऱ्या पर्यटकांना चांगली सेवा देण्याचे काम सरपंच बांडे करीत असतात. स्वच्छ भारत ही संकल्पना प्रत्यक्ष राबविण्यात येत असल्याने पर्यटकांनाही त्याचे अप्रूप वाटते. हा पुरस्कार आपणास अधिक कार्य करण्यासाठी प्रेरणादायी व प्रोत्साहित करणारा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. हा पुरस्कार स्वीकारताना त्यांच्या समवेत प्राचार्य दिलीप रोंगटे,शेंडी गावचे आदर्श माजी सरपंच दिलीपराव भांगरे,साम्रद चे माजी सरपंच चंदर बांडे, ग्रामसेवक श्री.मुंढे,नामदेव बांडे, मारुती बांडे, सोपान बांडे,राहुल बांडे,अतुल बांडे, सचिन शहा आदी मान्यवर उपस्थित होते. एकनाथ बांडे यांना हा पुरस्कार।मिळाल्याबद्दल अमितदादा भांगरे,सुनीताताई भांगरे आदीसह ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



## रस्त्यात सापडलेले सोन्याचे मंगळसूत्र महिलेला केले परत

मुंबई (स. गांवकरी) : आजच्या युगात जिथे प्रामाणिकपणा दुर्मिळ होत चालला आहे, तिथेच एका सुजाण नागरिकाच्या प्रामाणिकपणामुळे आणि 'एस हॉस्पिटल 'एरंडवणे येथील कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे एका महिलेचे हरवलेले लाखो रुपयांचा दागिना तिला सुखरूप परत मिळालाआहे. रस्त्यात सापडलेले अंदाजे १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र संबंधित महिलेला परत करून समाजात अजूनही प्रामाणिकपणा जिवंत असल्याचा प्रत्यय आणून दिला आहे. मागील आठवड्यात एस हॉस्पिटलच्या बाहेरील रस्त्यावर एका महिला रूग्णाचे अंदाजे १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हरवले होते. यानंतर या महिलेने हॉस्पिटलमध्ये येऊन कर्मचाऱ्यांना याबद्दल सांगितले. हॉस्पिटल स्टाफने वेळ न दवडता त्या दिवशी तिथे आलेले रुग्ण, नातेवाईक आणि व्हिजिटर्स यांच्याकडे चौकशी सुरू केली. दरम्यान, त्या दिवशी हॉस्पिटलमध्ये व्हिजिटसाठी आलेले मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह श्री.गणेश वाघमारे यांना रस्त्याने येताना हे मंगळसूत्र सापडले होते. हॉस्पिटलमध्ये याबाबत चौकशी सुरू असल्याचे त्यांना त्यांचे मित्र अजय कापसे यांचेकडून समजताच, त्यांनी हॉस्पिटल प्रशासनाला फोन करून दागिना आपल्याकडे सुरक्षित असल्याचे कळवले. यानंतर हॉस्पिटल प्रशासनाने संबंधित महिला रुग्णाच्या पतीला बोलावून घेतले आणि सर्वांसमक्ष सोन्याचे मंगळसूत्र त्यांना सुखरूप परत केले.

## दुर्मिळ चयापचय विकाराचे निदान व उपचार

मुंबई (स. गांवकरी) : आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमधील बहुविभागीय तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने चयापचय विकार या दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या आजाराने ग्रस्त असलेल्या एका बालरुग्णावर यशस्वी उपचार केले. हा दुर्मिळ आजार गिलियन-बॅरे सिंड्रोम (जीबीएस) सारखा दिसत होता. यामुळे मज्जासंस्थेशी संबंधित (न्यूरोलॉजिकल) लक्षणांमागील लपलेली कारणे शोधण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. पूर्णपणे निरोगी आणि सामान्य विकास झालेल्या ४ वर्षे ९ महिन्यांच्या एका मुलामध्ये काही दिवसांपूर्वी ताप, खोकला आणि सर्दीची लक्षणे दिसून आली. त्यानंतर अल्पकाळ झटके आल्यानंतर त्याला आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले. रुग्णालयात दाखल होताना तो शुद्धीत होता. मात्र डॉक्टरांनी त्याचा रक्तदाब अत्यंत जास्त असल्याचे आणि शरीरातील प्रतिक्षिप्त क्रिया अनुपस्थित असल्याचे लक्षात घेतले. त्यानंतर त्याला बाल अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. पुढील २४ तासांत त्या मुलामध्ये हात-पायांचा अशक्तपणा वाढला आणि श्वास घेण्यास अडचण निर्माण झाली. त्यामुळे अखेरीस त्याला व्हेंटिलेटरची गरज भासली. तपासण्यांमधून त्याला गिलियन-बॅरे सिंड्रोम असल्याचे संकेत मिळाले आणि तातडीने उपचार सुरू करण्यात आले. मुलाला तब्बल ७५ दिवस यांत्रिक श्वसन सहाय्य द्यावे लागले.

## जागतिक परिस्थिती बदलली तरी भारताची गती कायम

- महाराष्ट्रात सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्या कडून अखंड इंधन पुरवठा

मुंबई (स. गांवकरी) : इंडियनऑइल महाराष्ट्र राज्यभर अखंड संचालन आणि लॉजिस्टिक्स समन्वय सुनिश्चित करत असून प्रत्येक ग्राहकासाठी दररोज पेट्रोल (MS), डिझेल (HSD) आणि एलपीजीची अखंड उपलब्धता कायम ठेवत आहे. भारतामधील नागरिकांच्या प्रत्येक सामान्य दिवसामागे सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांची (PSU OMCs) 24X7 असामान्य तयारी कार्यरत असते आणि वाढीची आकडेवारी याचीच साक्ष देते. महाराष्ट्रात मे 2026 दरम्यान मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत पेट्रोल (MS) किरकोळ विक्रीत 22% वाढ नोंदविण्यात आली आहे, तर डिझेल (HSD) किरकोळ विक्रीत 33% ची मजबूत वाढ झाली आहे. इतर पुरवठादारांच्या तुलनेत असलेल्या किंमत फरकामुळे संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहक इंडियनऑइल रिटेल आउटलेट्सकडे वळत असून तसेच हंगामी शेतीविषयक कामकाजामुळे मागणीत वाढ होत आहे. भारताच्या अखंड गतिमानतेमागे एक असे नेटवर्क कार्यरत आहे जे कधीही थांबत नाही —शेतांपासून महामार्गांपर्यंत,डोंगराळ भागांपासून किनारपट्टीपर्यंत,दुर्गम प्रदेशांपासून आव्हानात्मक सीमांपर्यंत, अनिश्चित जागतिक परिस्थितीतही इंडियनऑइल अखंड इंधन पुरवठा सुनिश्चित करत आहे. इंडियनऑइल पुन्हा एकदा स्पष्ट करते की देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

# अवादा ग्रुपची पुण्यात जनजागृती मोहीम

पुणे : (स. गांवकरी)




अक्षय ऊर्जेबाबत देशभरात जनजागृती वाढवण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या उपक्रमांतर्गत, भारतातील अग्रगण्य एकात्मिक ऊर्जा संक्रमण समूहांपैकी एक असलेल्या अवादा ग्रुपने 'अवादा भारत उदय यात्रा' हा आपला प्रमुख उपक्रम पुण्यात राबविला. अवादा ग्रुपने या माध्यमातून नागरिक, स्थानिक समुदाय आणि विविध घटकांशी शाश्वत ऊर्जा आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत संवाद साधला.

८ मे २०२६ रोजी नोएडामधून या यात्रेला सुरुवात करण्यात आली. अक्षय ऊर्जा स्वीकार आणि शाश्वत जीवनशैली याबाबत तळागाळात जागरूकता निर्माण करणे, तसेच भारताच्या स्वच्छ आणि अधिक आत्मनिर्भर ऊर्जा भविष्याच्या दिशेने होणाऱ्या संक्रमणाला बळ देणे, हा या देशव्यापी जनजागृती मोहिमेचा उद्देश आहे. विशेष डिझाइन केलेल्या या व्हॅनने आतापर्यंत उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या चार राज्यांसह नऊ शहरांमधून सुमारे १७१४ किमीचा प्रवास पूर्ण केला आहे. प्रत्यक्ष उपक्रम आणि जनसहभाग मोहिमांच्या माध्यमातून ही यात्रा थेट स्थानिक समुदायांशी संवाद साधत आहे. पुण्यामध्ये या यात्रेला नागरिक, विद्यार्थी आणि स्थानिक संस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सौर, पवन आणि जलविद्युत यांसारख्या अक्षय ऊर्जा उपाययोजनांबाबत नागरिकांमध्ये वाढत असलेली उत्सुकता आणि जागरूकता यावेळी स्पष्टपणे दिसून आली. या उपक्रमाविषयी बोलताना अवादा ग्रुपचे अध्यक्ष विनीत मित्तल म्हणाले, "भारतात हरित ऊर्जेचा स्वीकार अधिक वेगाने वाढवण्याची हीच योग्य वेळ आहे. जागतिक स्तरावरील भू-राजकीय अनिश्चितता आणि जीवाश्म इंधन पुरवठा साखळीतील अडथळ्यांचा ऊर्जा बाजारपेठेवर परिणाम होत असताना, भारताचे अक्षय ऊर्जेकडे होणारे संक्रमण हे केवळ पर्यावरणाशी संबंधित प्राधान्य नसून ऊर्जा सुरक्षितता आणि आत्मनिर्भरतेसाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. या प्रवासातील निर्णायक टप्प्यावर भारत उभा आहे आणि पुढील टप्प्याला नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच चालना मिळणार आहे. 'अवादा भारत उदय यात्रे'च्या माध्यमातून अक्षय ऊर्जा अधिक सुलभ, सर्वसामान्यांशी जोडलेली आणि प्रत्यक्ष कृतीत आणण्याजोगी बनवण्याचा आमचा प्रयत्न आहे. जनजागृतीचे रूपांतर देशव्यापी चळवळीत करणे, हेच या उपक्रमामागील उद्दिष्ट आहे."

पुण्यातील मुक्कामादरम्यान या यात्रेमध्ये विविध आकर्षक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अक्षय ऊर्जेच्या संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यासाठी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले. तसेच, अक्षय ऊर्जेबाबत असलेल्या सर्वसामान्य गैरसमजांवर आधारित संवादात्मक सत्रांचे आयोजन करण्यात आले. नागरिकांना शाश्वत जीवनशैलीसाठी वैयक्तिक बांधिलकी व्यक्त करता यावी, यासाठी 'डिजिटल ग्रीन प्लेज' (डिजिटल हरित प्रतिज्ञा) घेण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामध्ये स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ऊर्जा कार्यक्षमता, शाश्वतता आणि समुदायाच्या सहभागातून होणारी वातावरणीय कृती यांसारख्या विषयांवर संवाद साधण्यात आला.

## एचपीसीएल आणि टाटा मोटर्सचा 'चक्रीय अर्थव्यवस्था'साठी पुढाकार




मुंबई : (स. गांवकरी)

हिंदुस्थान पेट्रोलियम महामंडळ आणि टाटा मोटर्स यांनी वापरलेल्या वाहन वंगणाचे संकलन व पुनर्वापर करण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत वापरलेल्या वंगणाच्या पुनर्प्रक्रियेसाठी शिस्तबद्ध आणि विस्तारक्षम पद्धतीवर आधारित प्रायोगिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमातून वापरलेल्या वंगणाच्या संकलनापासून ते पुनर्प्रक्रियेपर्यंत संपूर्ण प्रक्रिया कार्यान्वित करण्यात येणार असून, त्यापासून पुन्हा उच्च दर्जाचे तेल तयार केले जाणार आहे. त्यामुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर होण्यास मदत होणार असून पर्यावरणीय धोका कमी करण्यासही हातभार लागणार आहे. हिंदुस्थान पेट्रोलियम महामंडळ वापरलेल्या वंगणाचे अधिकृत माध्यमातून संकलन करून ते पुनर्प्रक्रिया केंद्रांपर्यंत पोहोचवणार आहे. तर टाटा मोटर्स आपल्या सेवा केंद्रांच्या जाळ्याद्वारे संकलन प्रक्रिया अधिक सक्षम करणार आहे. तसेच कचऱ्याची जबाबदार विल्हेवाट लावण्याबाबत जनजागृतीलाही चालना दिली जाणार आहे. एचपीसीएलचे वंगण विभागाचे कार्यकारी संचालक सी. एच. श्रीनिवास यांनी सांगितले की, वापरलेल्या तेलाचा पुनर्वापर वाढवून कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा आहे. तर टाटा मोटर्सचे सुटे भाग व सेवा विभाग प्रमुख विक्रम अग्रवाल यांनी या उपक्रमामुळे पर्यावरणपूरक आणि जबाबदार पुनर्वापर व्यवस्थेला बळ मिळणार असल्याचे सांगितले.

## आयुर्वेद ही अचूक रोगनिदानाची शास्त्रशुद्ध विचारपद्धती

### डॉ. हरिश पाटणकर यांचे प्रतिपादन; लंडनमधील 'एपीए आयुर्फेस्ट २०२६'मध्ये बीजभाषण

पुणे : (स. गांवकरी)



आयुर्वेदातील रोगनिदान ही केवळ लक्षणांवर आधारित प्रक्रिया नसून, शरीर, मन आणि प्रकृतीचा सखोल अभ्यास करणारी शास्त्रशुद्ध विचारपद्धती आहे. दोष, धातू आणि मल या मूलतत्त्वांच्या आधारे कोणत्याही रोगाचे अचूक निदान करता येते. रोगाचे निदान, त्याचे समूळ नष्ट करण्याची क्षमता आयुर्वेदामध्ये असून, आयुर्वेदाला अधिक प्रभावी करण्यासाठी संशोधन व तंत्रज्ञानाची जोड द्यायला हवी," असे प्रतिपादन पुण्यातील प्रख्यात आयुर्वेदतज्ज्ञ, संशोधक आणि भारतीय ज्ञानपरंपरेचे अभ्यासक डॉ. हरिश पाटणकर यांनी केले. लंडन येथील आयुर्वेद प्रोफेशनल्स असोसिएशनच्या वतीने 'एपीए आयुर्फेस्ट २०२६', या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. पाटणकर यांचे 'भारतीय आयुर्वेदाची मूलभूत तत्वे' यावर बीजभाषण झाले. या परिषदेत जगभरातील सुमारे दोनशेहून अधिक नामवंत आयुर्वेदतज्ज्ञ, संशोधक आणि व्यावसायिकांची उपस्थिती होती. डॉ. विजय मूर्ती, लोथार पिर्क, डॉ. करेन ओ'ब्रायन-कोप, डॉ. मनीष पंडित, डॉ. सुनिल कुमार, डॉ. रूपी औजला, डॉ. विनायक अबॉट, डॉ. कांचन शर्मा, डॉ. ख्रिस्तोफर एथरिज, डॉ. स्नेहल पाटणकर यांसारखे आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. पाटणकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. पाटणकर यांनी आपल्या भाषणात आयुर्वेदातील दोष, धातू आणि मल या मूलभूत तत्त्वांच्या आधारे रोगनिदान करण्याच्या व्यापक विचारपद्धतीचे विवेचन केले. आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून शरीर, मन आणि प्रकृतीचा एकत्रित विचार करणारे संपूर्ण जीवनशास्त्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पारंपरिक ज्ञानाची आधुनिक संदर्भात केलेली मांडणी, चिकित्सक दृष्टिकोन आणि संशोधनाधारित विचार यामुळे उपस्थित विदेशी व्यावसायिक विशेष प्रभावित झाले. भारतीय आयुर्वेदाची सखोलता आणि जागतिक आरोग्य व्यवस्थेमधील त्याचे महत्त्व या व्याख्यानातून प्रभावीपणे अधोरेखित झाले. डॉ. पाटणकर हे 'केशायुर्वेद' या भारतातील पहिल्या आर्युवेदिक हेअर टेस्टिंग लॅब अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक संचालक आहेत. आयुर्वेद संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम घडवणारे संशोधक म्हणून त्यांची ओळख आहे. 'केशायुर्वेद'ला २०२२ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'बेस्ट आयुष स्टार्टअप' हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. तसेच डॉ. पाटणकर प्राचीन संहिता गुरुकुल संस्थेमार्फत आयुर्वेद शिक्षण, भारतीय ज्ञानपरंपरा आणि संस्कृताधारित वैद्यकीय वारसा जतन करण्यासाठी कार्यरत आहेत. देश-विदेशातील विद्यार्थ्यांना भारतीय आयुर्वेदाची शास्त्रीय मांडणी समजावून सांगण्याचे कार्य त्यांच्या संस्थेमार्फत केले जात आहे.

## एमजी मॅजेस्टर 4x2 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम ₹40.99 लाख

मुंबई : (स. गांवकरी)



JSW MG मोटर इंडियाने आज बहुप्रतिक्षित MG MAJESTOR, भारतातील पहिली D+ SUV लॉन्च करण्याची घोषणा केली. ज्या ग्राहकांना त्यांच्या पुढील SUV कडून अधिक अपेक्षा आहेत, त्यांच्यासाठी डिझाइन केलेली MAJESTOR, रस्त्यावर प्रभावी उपस्थिती, प्रगत अभियांत्रिकी आणि उत्कृष्ट सर्व-भूभाग क्षमता यांचा मिलाफ आहे.

एमजी मॅजेस्टर 4x2 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम INR 40.99 लाख (एक्स-शोरूम किंमत) (६ आणि ७-सीटर) एमजी मॅजेस्टर 4x4 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम INR 44.99 लाख (एक्स-शोरूम किंमत) रुपयांना लॉन्च करण्यात

आली आहे. या लॉन्चवर भाष्य करताना, जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक, अनुराग मेहरोत्रा म्हणाले, "एमजी मॅजेस्टर ही भारतातील पहिली D+ एसयूव्ही असून, ती आमच्या पोर्टफोलिओमध्ये एक मोठे परिवर्तन घडवते. ही गाडी उत्कृष्ट कामगिरी, प्रीमियम आराम, प्रगत तंत्रज्ञान आणि अतुलनीय विश्वासार्हता यांचा शक्तिशाली मिलाफ सादर करते. तिच्या अतुलनीय आकारमानामुळे, ऑफ-रोडवरील प्रभुत्वामुळे आणि अनेक सेगमेंट-फर्स्ट वैशिष्ट्यांमुळे, मॅजेस्टर नवीन मापदंड स्थापित करते आणि भारतीय एसयूव्ही क्षेत्रात एक खरोखरच वेगळे मूल्य प्रदान करते."

मॅजेस्टरची रचना खऱ्या एसयूव्ही कामगिरीसाठी केली आहे. तिचे ट्विन-टर्बो डिझेल इंजिन 2WD आणि प्रगत 4WD या दोन्ही प्रकारांमध्ये 8-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह जोडलेले असून, ते आपल्या वर्गात सर्वोत्तम 215.5 PS आणि 478.5 Nm टॉर्क देते. इंटेलिजेंट 4WD सिस्टीममध्ये 10 ऑफ-रोड मोड्स आहेत, जे दैनंदिन कार्यक्षमता आणि मजबूत क्षमतेमध्ये सहजपणे संतुलन साधतात. ऑटो मोडमध्ये, सामान्य परिस्थितीत ते 2WD मध्ये चालते आणि ट्रॅक्शन कमी झाल्यावर त्वरित 4WD मध्ये शिफ्ट होते—जे पाऊस, बर्फ किंवा निसरड्या पृष्ठभागांसाठी उत्तम आहे.

ऑफ-रोड क्षमता अधिक मजबूत करण्यासाठी, मॅजेस्टर हे त्याच्या सेगमेंटमधील पहिले वाहन आहे ज्यात फ्रंट, रिअर आणि सेंटर डिफरेंशियल लॉक्स आहेत, ज्यामुळे चाकांनी ट्रॅक्शन गमावले तरीही गाडी बाहेर काढता येते. क्रॉल कंट्रोल मोड, 219 मिमी ग्राउंड क्लिअरन्स** आणि 810 मिमी पाण्यातून जाण्याच्या क्षमतेसह, हे वाहन अत्यंत खडतर भूभागावरही ताकद आणि आत्मविश्वासाने मात करण्यासाठी बनवले आहे. 2950 मिमीच्या मोठ्या व्हीलबेससह, मॅजेस्टरची आकर्षक लांबी 5046 मिमी, रुंदी 2016 मिमी आणि उंची 1870 मिमी आहे. त्याची मोझॅक मॅट्रिक्स ग्रिल, ड्रॅगन आईज डीआरएल, ट्राय-बीम हेडलॅम्प्स, कनेक्टेड एलईडी टेल लॅम्प्स, उंच हूड लाइन आणि 19-इंच अलॉय व्हील्स याला एक आकर्षक पण परिष्कृत लुक देतात.

## विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये चमकदार कामगिरी

पुणे : (स. गांवकरी)



विज्ञान ऑलिम्पियाड फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या ऑलिम्पियाड स्पर्धांपैकी एक असलेल्या एसओएफ ऑलिम्पियाड २०२५-२६ मध्ये पुण्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. विविध विषयांच्या स्पर्धांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवत विद्यार्थ्यांनी शहराचा नावलौकिक वाढविला आहे.

भारती विद्यापीठ रवींद्रनाथ टागोर उत्कृष्टता विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी आर्य वैभव कुलकर्णी याने आंतरराष्ट्रीय इंग्रजी ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले. तसेच एसएनबीपी आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता अकरावीचा विद्यार्थी देव सक्सेना याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश संपादन केले.

विबग्योर उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सहावीचा विद्यार्थी अर्जुन डोंगस्वार याने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले, तर अक्षरा आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता आठवीचा विद्यार्थी अरमान गुहा याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश मिळवले. सर्व विद्यार्थ्यांना सुवर्णपदके, प्रमाणपत्रे आणि विशेष प्रावीण्य गौरवपत्र प्रदान करण्यात आले. यंदाच्या एसओएफ ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये पुण्यातील तीन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे त्यांच्या शाळांबरोबरच संपूर्ण पुणे शहराचा गौरव वाढला असून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

# जुन्या लोहा शहरात जाणार रस्ता रुंद : नव्या पिढीची सोय

- वर्षानुवर्षे ग्रामपंचायत काळात जे झाले नाही ते नगराध्यक्ष शरद पवार व टीमने केले;
- आ. प्रतापरावानी दिलेले आश्वासन पूर्तता होतेय
- सहा मालमता धारकांनी दिली स्वतःची जागा
- जुन्या शहरात जाणार मस्जिद जवळ रोड प्रशस्त

लोहा : (स. गांवकरी)

ग्रामपंचायत असतानाही जुन्या शहरात जाणार रस्त्या मस्जिद जवळ मोठा अरुंद होता पण अलीकडच्या काळात जुन्या भागात जाणाऱ्या रस्त्यावर मनमानी करत दुकानदारांनी अतिक्रमण केले नालीच्या पुढे पायऱ्या आणल्या व मूळ रस्त्याची रुंदी अरुंद झाली. नगर परिषद प्रशासन "मूक-बधिर-अंध " होती.

परंतु नगराध्यक्ष शरद पवार व टीमने धाडसी निर्णय घेत या मार्गावरील अतिक्रमणे हटविणे सुरू केले त्यात स्वतःच्या मालकीची सहा जणांनी जागा दिली घरे पडून रस्ता ररुंदीकरणाच्या मोहिमेत यांनी मोठे योगदान दिले.

नव्या पिढीच्या सोय झाली असून दूरदृष्टी ठेवून नगराध्यक्ष शरद पवार व टीमने हाती घेतलेले काम ऐतिहासिक ठरले आहे.जे ग्रामपंचायत काळात घडले नाही नगर पालिका अस्तिवात आल्या नंतरही झाले नाही ते अविस्मरणीय काम नगराध्यक्ष शरद पवार व नगरसेवक सहकाऱ्यांनी केले.

लोहा वाढते शहर वाढते आहे. जुन्या शहरात विस्तार फारसा नसला तरी बायपास झाल्या मुळे त्या भागात विकासाच्या "वाटा " रुंदावणार आहेत तशी सुरुवात सुद्धा झाली आहे.

भाजीमंडई ते जुना लोहा या भागात दुकानदारांनी अतिक्रमणे केली .विकासात " वाटा" वाढला होता पण अनेक भागात "वाट "अरुंद होत गेल्या त्याकडे मागील काळात दुर्लक्ष झाले पण सत्तांतरा नंतर स्वतः आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शहराच्या विकास कामाचा आढावा घेणे सुरू केले आहे त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील यांचे नेतृत्वात नगराध्यक्ष शरद पवार ,उपनगराध्यक्ष करीम शेख, व टीम धाडसी निर्णय घेऊ लागले आहेत यात भाजी मंडई ते जुना शहरात जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण हाती घेण्यात आले .आहे

नगराध्यक्ष शरद पवार यांच्या दालनात मालमताधारकांची बैठक झाली उपनगराध्यक्ष करीम शेख माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, गटनेते भास्कर पवार हरिभाऊ चव्हाण व नगरसेवक उपस्थितीत होते माजी नगरसेवक नबी शेख , गुलाम शेख , पत्रकार फेरोज मणियार व या भागातील प्रमुखांनी रस्त्यासाठी जागा देण्यासाठी मालमताधारकांना समजावून सांगितले तशी मनाची तयारी केली आणि या गरीब कुटुंबानी स्वतःची जागा रस्त्यासाठी दिली तर लोह्याचे भूमिपुत्र लातूर -उदगीर चे डीवायएसपी गजानन भातलवंडे यांनी सुद्धा तजुनी इमारत पडून जागा दिली व शहराच्या विकासाला सहकार्य केले.

### विकासाची प्रशस्त 'वाट'

बसस्थाका जवळील रस्ता नव्या वाहतुकीची सेतू ठरणार आहे प्रियदर्शनी नगर इंदिरानगर आंबेडकर नगर इंदिरा नगर विस्तारित भाग या दहा हजार वस्तीसाठी हा रस्ता विकासाची नवी "वाट" ठरणार आहे तर जुन्या शहरात जाणार रस्ता रुंद होतो आहे .आ प्रतापराव पाटील याच्या नेतृत्वात सर्व नगरसेवकांच्या सहकार्याने व प्रशासनाच्या मदतीमुळे "रस्ते " प्रशस्त हाताहेत .सहा मालमताधारकांनी शहरासाठी दिलेले योगदान खूप मोठे असून हे रुंदीकरण ऐतिहासिक ठरणार आहे .ग्रामपंचायत काळात जे झाले नाही ते नगराध्यक्ष शरद पाटील यांनी करून दाखवले शहरवासीयांनी नगराध्यक्ष शरद पवार व टीमचे अभिनंदन केले आहे

### सहा घरमालकानी स्वतःची जागा दिली

१) घरमालक साहेरबी मजीद तांबोळ, २)खदीर महेबूबसाब तांबोळी३) शेख महेबूब साब ४) शेख अब्दुल करीम ५)मोमिन बशीर आतार ६) अब्दुल रहेमानसाब सय्यद ७). बालाजी रामदास भातलवंडे या मालमताधारकांनी आपली घरे पाडून रोडसाठी जागा दिली नगराध्यक्ष यांनी या सर्वांचे अभिनंदन केले. त्याच्यामुळेच मस्जिद जवळ रस्ता रुंद झाला ही सोय पुढच्या पिढीसाठी उपयोगी ठरणार आहे